महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
■ इलेक्ट्रिकल सुपरवायझर ■ अॅटोमोबाईल टेक्निशियन
■ इलेक्ट्रिकल वायरमन ■ मोटार वाइंडिंग
■ टू-व्हीलर मेकॅनिक ■ फोर व्हीलर मेकॅनिक
■ A.C. मेकॅनिक ■ वेल्डर / प्लंबर
■ कॉम्प्युटर ऑपरेटर ■ कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्अॅप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ७६ वा | शनिवार, दि. ११ ऑक्टोबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# मोहोळचे नवे नगराध्यक्ष नक्की कोण ठरवणार ?

# विद्यमान आमदारांबरोबर माजी आमदारांचीही प्रतिष्ठा पणाला

## सत्तेच्या गडापेक्षा नगराध्यक्षपदाच्या सिंहासाठीच चढाओढ

**मोहोळ (साहिल शेख):-** सोलापूर जिल्ह्यातील मध्यवर्ती आणि राजकीय दृष्ट्या सातत्याने चर्चेत असलेल्या मोहोळ नगर परिषदेच्या स्थापना झाल्यापासूनच्या दुसऱ्या सार्वत्रिक पंचवार्षिक निवडणुकीसाठी सर्वपक्षीय वातावरण निर्मितीला प्रारंभ झाला आहे. अनुसूचित जाती महिला प्रवगार्साठी नगराध्यक्षपद राखीव झालेल्या या नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी अंतर्गत प्रभाग निहाय आरक्षण सोडत देखील नुकतीच पार पडली आहे. त्यामुळे आता खऱ्या अथार्ने निवडणुकीच्या प्रचारालाच प्रारंभ झाला आहे असे म्हणायला हरकत नाही. गत निवडणुकीच्या निकालामध्ये अत्यंत संमिश्र कौल आल्यामुळे सत्ता स्थापनेचा दावा धाडसाने कोणत्या पक्षाला करता आला नाही. राष्ट्रवादीने चार जागा, शिवसेनेने सर्वाधिक सहा जागा काँग्रेस पक्षाने दोन जागा तर रमेश बारसकर यांच्या आघाडीने तीन जागा मिळवल्या होत्या.

आता निवडणूक होऊन तब्बल नऊ वषार्चा कालावधी उलटला आहे. या कालावधीत मोहोळ शहराच्या राजकीय पुलाखालून बरेच नाट्यमय घडामोडीचे पाणी वाहून गेले आहे. मोहोळ विधानसभा सध्या राष्ट्रवादी शरदचंद्र पवार






पक्षाच्या कागदोपत्री ताब्यात आहे. मात्र विद्यमान आमदार राजू खरे हे शिंदे सेनेच्या सातत्याने संपर्कात असल्यामुळे आ.राजू खरे या नगरपरिषद निवडणुकीत शिंदे सेनेच्या माध्यमातून निवडणुकीत ताकद लावणार की शरदचंद्र पवार पक्षाच्या माध्यमातून ताकद लावणार याबाबत मोठी उत्सुकता आहे. मोहोळचे माजी आमदार तथा मोहोळ तालुक्याच्या विकासात्मक आणि राजकीय घडामोडीच्या केंद्रस्थानी असलेल्या राजन पाटील यांची भूमिका सध्या अत्यंत महत्त्वाची आहे. कारण राजन पाटील हे राष्ट्रवादी अजित दादा पवार यांच्या पक्षासोबत असल्यामुळे ते महायुती मध्ये समावेशित असलेले नेतृत्व आहेत. शिवाय ते महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष असल्याने राज्यमंत्रीपदाच्या दजार्चे काम पाहत आहेत. त्यामुळे ते स्वबळावर मोहोळ शहरात पॅनलची निर्मिती करून निवडणूक लढवणार की महायुती म्हणून भाजप आणि शिंदे सेनेला सोबत घेऊन निवडणूक लढणार याबाबत मोठी उत्सुकता आहे. मात्र तालुक्यातील शिंदे सेना त्यांना सातत्याने पाण्यात पाहत असल्यामुळे ते राजन पाटील यांच्या समविचारी आघाडी सोबत जातील की नाही याबाबत जरा शंकाच आहे.मात्र आजवरचा राजन पाटील यांचा अनुभव पाहता ते एकला चलोरे च्या भूमिकेत असल्यामुळे ते समविचारी पक्षप्रवाहातील व्यक्तींना सोबत घेऊन ही निवडणूक लढवून शकतात. चार दोन जागा कमी आल्या तरी चालेल मात्र मोहोळ सारख्या मोक्याच्या आणि राजकीय दृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या नगर परिषदेचे नगराध्यक्ष पद खेचून घेण्यासाठी ते आपला नेहमीचा सोशल इंजिनिअरिंगचा डाव टाकू



शकतात. ज्या ज्या वेळेस मोहोळचे सर्वोच्च पद हे खुल्या प्रवर्गासाठी असते त्यावेळेस शिवसेना विजयी होते हा आजवरचा इतिहास आहे. मात्र ज्या ज्या वेळेस मोहोळचे पद हे सर्वसाधारण वगळता इतर सर्व प्रवगार्साठी असते, तेव्हा मतांची आणि निकालानंतर जागांची गोळा बेरीज करत राजन पाटील स्वतःच्या नेतृत्वाचा झेंडा मोहोळच्या स्थानिक स्वराज्य संस्थांवर फडकवतात हा देखील इतिहास सर्वांनी पाहिला आहे. त्यामुळे मोहोळ नगर परिषदेची ही निवडणूक त्यांच्या नेतृत्वाचा कस पणाला लावणारी ठरणार आहे.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत मोहोळ शहराने महायुती ऐवजी महाविकास आघाडीला भरभरून मतांचे दान दिले आहे. आता या मतदानाच्या बदल्यात लोकसभेच्या खासदार आणि विधानसभेच्या आमदारांनी गेल्या वर्षभरात मोहोळला काय दिलं याबाबत आत्मचिंतन करणे गरजेचे आहे. साहजिकच दोन्ही निवडणुकाला मोहोळमधून मोठे मताधिक्य मिळाल्यामुळे याच महाविकास आघाडी कडून निवडणूक लढवण्यासाठी चढाओढ लागणे गरजेचे होते. मात्र आता तशीच चढाओढ महायुती म्हणजे राजन पाटील आणि भाजपा आघाडीकडून देखील उमेदवारी मिळवण्यासाठी पडद्याआड सुरू झाली आहे.

गेल्या चार ते पाच वर्षात राजन पाटील यांनी राज्य शासनाच्या माध्यमातून जवळपास चारशे कोटी रुपयांचा निधी माजी आमदार यशवंत माने यांच्या समवेत प्रयत्न करून आणला आहे.

याचे श्रेय केवळ आणि केवळ माजी आमदार राजन पाटील यांना जाते. कारण त्यांनीच वित्तमंत्री ना. अजितदादा तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नगर विकास खात्याकडे अविरत पाठपुरावा करून शहराच्या विकासासाठी निधी आणला. त्यामुळेच शहराचा सर्वांगीण चेहरा मोहरा बदलला हे कोणीही नाकारणार नाही. मात्र त्यांनी सत्ता स्थापन केल्यानंतर मोहोळ शहरातील सर्वच नगरसेवकांनी पक्ष भेद गट तट विसरून स्वतःचे प्रापंचिक प्रश्न सोडवण्यासाठी जी धडपड केली ते देखील शहराने उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे. त्यामुळे बऱ्याच नगरसेवकांना विकासकामे किती केली हे दाखवण्यापेक्षा ती कमी कोणत्या दजार्ने आणि कशा स्वरूपात केली हे देखील समोर आणणे गरजेचे आहे. मोहोळ शहरात काही नगरसेवक असे आहेत की त्यांनी आपल्या प्रभागातील जनसंपर्क कधीही कमी होऊ दिला नाही चार दोन कामे कमी केली मात्र सर्वसामान्यांच्या अडीअडचणीला धावून जाण्याची त्यांनी घेतलेली भूमिका त्यांना राजकीय क्षेत्रात कायम ठेवणार आहे.

### नगराध्यक्षपदासाठी इच्छुक असलेले सर्वपक्षीय चेहरे..

शितल क्षिरसागर, स्मिता कोकणे, उज्वला कांबळे, यशोदाताई कांबळे, रजनी कांबळे, शोभा सोनवणे,लक्ष्मी खंदारे, वर्षा क्षीरसागर, अँड. सोनल जानराव, प्राची सोनवणे, प्राजक्ता आखाडे, रमा आठवले, डॉ. धन्वंतरी आवारे, सपना क्षीरसागर

विद्यमान आमदार राजू खरे यांच्या गटप्रवाहात अजून म्हणावी तशी तयारी दिसून येत नाही. महाविकास आघाडीला आणि त्यामधील ढीगभर रथी महारथींना गेल्या वर्षभरात मोहोळ शहरात साध्या टोपलंभर मुरमाचा देखील नारळ फोडता आला नाही. नुसताच फेसबुकवर कौतुकाचा पोकळ फेस आणि व्हाट्सअप वर शुभेच्छांच्या आभासी वषार्वात हा पक्ष मशगुल आहे.आ. राजू खरे हे विधानसभेला विजयी झाल्यानंतर त्यांना मोहोळ शहरात आपला फारसा विकासकामांचा करिष्मा आजतागायत दाखवता आला नाही. कारण निवडणूक होऊन एक वषार्चा कालावधी झाला तरीही त्यांना आणि त्यांच्या सोबतच्या इतर सर्वपक्षीय नेत्यांना मोहोळसाठी भरीव निधीच काय मात्र छत्रपती शिवाजी महाराज चौक ते गवत्या मारुती चौक, शहराचा मुख्य रस्ता या मार्गावरील खड्डे देखील बुजवता न आल्यामुळे मोहोळ शहरात यापुढे विकासाचे राजकारण नक्की कधी सुरू होणार हे नाव उलगडणारे कोडे आहे ?

मोहोळच्या विधानसभा निवडणुकीनंतर तब्बल एक वषार्नंतर होणाऱ्या या निवडणुकांमध्ये जवळपास सर्वच पक्षांच्या बाबतीत पुन्हा तोच एक मुद्दा अधोरेखित होणार आहे तो म्हणजे यापूर्वी निवडणूक ही सत्तेच्या लाभाची ढेकर दिलेले आणि उपाशी मेलेले जणू यांच्यामध्येच झाली. ढेकर दिलेले हे संख्येने कमी आहेत मात्र

ते सातत्याने नेतृत्वाच्या भोवती काडीमात्र संघटन कौशल्य नसताना गोंडा घोळत असतात. शिवाय ते जनाधार टिकवण्यामध्ये यशस्वी झालेले नाहीत. आणि उपाशी मेलेले हे स्वतः नाराज इतके आहेत की ते आजूबाजूच्या लोकांना देखील नाराजीमध्ये रूपांतरित करू शकतात. ही बाब एका कोणत्या पक्षाची नाही तर ही समस्या सर्वच पक्षांची आहे. विरोधक म्हणतात आम्ही यशस्वी झालो ते सत्ताधाऱ्यांच्या अपयशामुळे तर सत्ताधारी पक्षातील काही जणांचे मत आहे की अप्पर कार्यालयाचा मुद्दा आम्हाला नडला. मात्र केवळ याच मुद्द्याला धरून अपयशाची गणिते गृहीत धरली जाऊ शकत नाहीत. कारण नाराजी ही कोणा व्यक्ती विरोधात एका निर्णयाविरोधात नव्हती तर सत्तेच्या लाभातील बेसावध सिस्टीम बाबतही देखील होती हे देखील नाकारता येणार नाही.

विकणे /भाड्याने देणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५
८२७५२७४२५३
पत्ता: अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

## माजी आमदार (स्व) गणपतराव देशमुखांच्या घरावर हल्ला

### आज सांगोला बंदची हाक



**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार (स्व.) भाई गणपतराव देशमुख यांच्या घरावर ता. १० ऑक्टोबर रोजी अज्ञातांकडून हल्ला करण्यात आला. या हल्ल्यामुळे सांगोल्यात एकच खळबळ उडाली असून शेतकरी कामगार पक्षाने या हल्ल्याच्या निषेधार्थ आज (ता. ११ ऑक्टोबर) 'सांगोला बंद'ची हाक दिली आहे. सांगोल्यात शुक्रवारी शेतकरी कामगार पक्षाचे माजी जिल्हा परिषद सदस्यांसह अनेक बड्या नेत्यांचा भाजप प्रवेश झाला. त्या प्रवेशापूर्वी अज्ञातांनी शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार (स्व.) गणपतराव देशमुख यांच्या घरावर बाटली फेकण्याचा प्रकार घडला आहे. त्यामुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे.

गणपतआबांच्या घरी सध्या त्यांचे नातू आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख राहत आहेत. एकीकडे सांगोला शहरात भाजप पक्षप्रवेश होणार होता, त्या वेळीच सांगोल्याचे माजी आमदार (स्व.) गणपराव देशमुख यांच्या घरावर अज्ञात व्यक्तींकडून हा हल्ला करण्यात आलेला आहे. हा हल्ला का करण्यात आला. त्यामागे कोण आहे, असा सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहे. दरम्यान, सांगोला शहरात (स्व.) गणपराव देशमुख यांच्या घरावर हल्ला करणाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी शेतकरी कामगार पक्षाकडून तहसीलदार संतोष कणसे व सांगोला पोलिस ठाण्याचे काशीद यांना निवेदन देण्यात आले आहे. या हल्लेखोरांना तातडीने अटक करण्यात यावी, अशीही मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, गणपराव देशमुख यांच्या घरावर झालेल्या या हल्ल्याचा सांगोला शहर व तालुक्यातील जनतेकडून तीव्र निषेध करण्यात आला असून आज शनिवारी सांगोला बंदची हाक देण्यात आलेली आहे.

## 'पुनर्वसन न झाल्यास शेतकरी मंत्रालयात घुसतील!'- कॉ. आडम मास्तर

### बैलगाडी आक्रोश मोर्चात खर्डा भाकरी खाऊन सरकारचा निषेध




**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** पूरग्रस्त शेतकरीझशेतमजूर आणि श्रमिक जनतेच्या पुनर्वसनाची मागणी करत आज सोलापूरमध्ये अखिल भारतीय किसान सभा आणि सीटूच्या वतीने ह्बैलगाडी आक्रोश मोर्चाह् काढण्यात आला. या मोर्चात शेकडो शेतकरी आपल्या बैलगाड्यांसह सहभागी झाले. सरकारकडून तातडीने पुनर्वसन न झाल्यास शेतकरी मंत्रालयात घुसतील, असा जळजळीत इशारा माजी आमदार कॉ. आडम मास्तर यांनी दिला.

ते पुढे म्हणाले की, कॉ. आडम मास्तर म्हणाले, 'शेतकऱ्यांना १०० टक्के भरपाई कुणीच देऊ शकत नाही, परंतु शेतकरी पुन्हा उभा राहिला पाहिजे. यासाठी सरकारने जाहीर केलेले ३१ हजार ६२८ कोटींचे पॅकेज हे केवळ दिखावा आहे. ६८ लाख हेक्टर पिकांचे नुकसान होऊनही दिलासा मिळालेला नाही. सरकारने (पान 2 वर..)

निरामय पॅरालिसिस सेंटर
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा अॅण्ड फिजिओथेरपी सेंटर
ISO 9001:2015
NGO
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये
कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार



नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं
समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568
पत्ता: गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर

## DPDC निधी समसमान पद्धतीने वाटप करण्याची खा. प्रणिती शिंदे यांची मागणी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी शिष्टमंडळासोबत सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेऊन DPDC (जिल्हा नियोजन समिती) निधीचे वाटप सर्व लोकप्रतिनिधींना समसमान आणि पारदर्शक पद्धतीने व्हावे अशी मागणी केली.

खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या, 'DPDC निधीमध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता किंवा पक्षीय भेदभाव होऊ नये. मागील ठउअढ निधीच्या वाटपात तफावत दिसून आली होती, ज्यात विरोधी पक्षाच्या लोकप्रतिनिधींना जाणूनबुजून डावलल्याचे स्पष्टपणे दिसते. अशीच परिस्थिती DPDC मध्ये होऊ नये. निधी न देणे हे आमच्यावर नव्हे तर जनतेवर अन्याय आहे. आपण सर्व लोकप्रतिनिधी आपल्या मतदारसंघातील लोकांच्या विकासासाठी निधी मागतो. जर निधी वाटपात पक्षीय भेदभाव झाला तर सोलापूरच्या जनतेवर अन्याय ठरेल. त्यामुळे पालकमंत्र्यांनी ही बाब संवेदनशीलतेने घेऊन महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायत स्तरावर समसमान निधी वाटप व्हावे,' अशी मागणी त्यांनी केली.

याप्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले की, 'DPDC निधी वाटप करताना कुठलाही पक्षीय दूजाभाव होणार नाही. विरोधी पक्षाच्या लोकप्रतिनिधींनाही योग्य त्या प्रमाणात निधी दिला जाईल. DPDC निधीचे वितरण प्रक्रिया नियमितपणे सुरू आहे,' अशी ग्वाही त्यांनी खासदार प्रणिती शिंदे व शिष्टमंडळाला दिली.

या प्रसंगी सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे, माजी महापौर संजय हेमगड्डी, आरिफ शेख, अलकाताई राठोड, प्रवीण निकाळजे, विनोद भोसले, परवीन इनामदार, अनुराधा काटकर, मनोज यलगुलवार, हणमंतू सायबोलू, सुशील बंदपट्टे, गणेश डोंगरे, प्रमिला तुपलवंडे, जुबेर कुरेशी, वाहिद बिजापूरे, तिरुपती परकीपंडला, भीमाशंकर टेकाळे, देवाभाऊ गायकवाड, युवराज जाधव, नागनाथ कदम, बाबुराव म्हेत्रे, उदय चाकोते, अब्दुल खलीक मुल्ला, रुपेश गायकवाड, अनिल जाधव, विवेक कन्ना, रफिक इनामदार, संजय गायकवाड, सुभाष वाघमारे, हेमाताई चिंचोलकर, सुमन जाधव, रेखा बिनेकर, मल्लेश सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते.

## ऑगस्टच्या नुकसान भरपाईचे कोट्यावधी ईकेवायसीत अडकले



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ऑगस्ट महिन्यात उत्तर, दक्षिण व अक्कलकोट तालुक्यातील १० मंडळांत झालेली अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या पीक नुकसानीचे ५९ कोटी ८० लाख रुपये मंजूर झाले.

पैसे मंजूर असले तरी शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा होण्यासाठीच्या अडचणी काही केल्या कमी होताना दिसत नाहीत.

पात्र ६० हजार शेतकऱ्यांपैकी बावीस हजार शेतकऱ्यांचे पैसे ईकेवासीसाठी अडकले, तर ११६७ शेतकऱ्यांच्या खात्यावर ९६ लाख रुपये जमा झाले आहेत.

ऑगस्ट महिन्यात सोलापूर जिल्ह्यात एकूण १७५ मि.मी. १६३ टक्के इतका पाऊस पडला होता. याशिवाय उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर व व अक्कलकोट तालुक्यातील १० मंडलांत अतिवृष्टी झाली होती.

या मंडलात पीक नुकसानीचे पंचनामे करण्यात आले होते. तसेच भीमा व इतर नद्यांना आलेल्या पुरामुळे पीके पाण्यात जाऊन नुकसान झाले होते. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची संख्या ६० हजार इतकी आहे.

या शेतकऱ्यांना ५९ कोटी ७९ लाख १६ हजार रुपये मंजूर आहेत. ऑगस्टमधील नुकसानीची १२ सप्टेंबरला रक्कम मंजूर झाली. त्यानंतर सप्टेंबर महिन्यात पुन्हा पुन्हा अतिवृष्टी व नुकसानकारक पाऊस पडत राहिला व सीनेला पूर आला. (पान 2 वर..)

## संपादकीय

# विखारी प्रचार

सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्याबाबत घडलेला प्रकार अत्यंत लाजीरवाणा होता. त्यात काय कारवाई करायची ती करून त्याचा सोक्षमोक्ष लावणे योग्य राहील. तसेच व्हायला हवे आणि या ओंगळ प्रकारची चर्चा थांबवायला हवी. कोळसा कितीही उगाळला तरी तो काळाच असतो हे माहिती असूनही तो उगाळण्यात जी धन्यता मानली जाते आहे ती अनाकलनीय आहे. झालेल्या घटनेच्या मुळाशी जाऊन तेथे शस्त्रक्रिया करणे अत्यावश्यक आहे व त्याकडे लक्ष द्यायला हवे. हल्ल्याचा प्रयत्न करण्याची कृती अचानक घडली असे भासत असले तरी कोणतीही कृती अचानक होत नसते. त्यासाठी अगोदर एक मैदान तयार केले जाते अन त्याला एक पार्श्वभूमी असते.

ही तयारी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष अशा दोन्ही स्वरूपाची असू शकते. त्यातूनच मते तयार केली जातात, बिघडवली जातात. कानात आणि मनात विष ओतले जाते. याचाच परिपाक म्हणून अनियंत्रित झालेली एखादी व्यक्ती असे काहीसे कृत्य करण्यास धजावते जे सरन्यायाधीशांच्या बाबतीत घडले. खरी समस्या आहे तिथेच. या विखारी विचारपेरणीला रोखणेच महत्त्वाचे. ते न केल्यास भविष्यात अशा वारंवार मान खाली घालायला लावणाऱ्या घटना होत राहतील. समाज माध्यमांच्या संदर्भात केवळ न्या. गवई यांनीच नाही तर विविध न्यायालयांच्या न्यायाधीशांनी वेळोवेळी धोक्याचे इशारे दिले आहेत.

तसेच एखाद्या प्रकरणाच्या सुनावणीच्या वेळी याचिका दाखल करताना याचिकाकर्त्याचा त्याने ज्या उद्देशाने ती याचिका दाखल केली आहे तोच उद्देश असतो असे नाही. बऱ्याचदा अंतस्थ हेतू वेगळे असतात आणि न्यायासनावर बसलेल्या व्यक्तींपासून ते लपून राहू शकत नाही. त्यावर ते प्रखर टिप्पणी करतात, प्रसंगी दंडही ठोठावतात. संबंधित याचिकाकर्त्याला अगदी तेच हवे असते कारण त्याने खरेच जनहितासाठी याचिका केली असेल तर तिची फारशी चर्चा होणारही नाही. त्याने जर प्रसिद्धीच्या हेतूने किंवा कोणाला लक्ष्य करण्यासाठी याचिका दाखल केली असेल तर त्याच्यावर त्याला अपेक्षित अशी शेरेबाजी उमटली तर त्याचाच हेतू साध्य होतो. खुद्द गवई यांनीही याबाबत भाष्य केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, न्यायाधीश जे तोंडी बोलतात त्याचा न्यायालयाच्या बाहेर आणि समाजमाध्यमांवर काय अर्थ काढला जाईल याची काहीच शाश्वती नसते.

एका प्रकरणात आपणच आपल्या सहकारी न्यायाधीशांना टिप्पणी करण्यापासून रोखले होते. त्याचे कारणच हे होते की त्या टिप्पणीचा अनर्थ काढून नव्या वादाला तोंड फुटले असते. स्वतः गवई यांच्याबाबतीत मात्र नेमके तसेच झाले जे टाळण्याची ते खबरदारी घेतात. गवई प्रकरण ताजे असल्यामुळे त्याची चर्चा होते आहे. निर्लज्जपणाचा कळस म्हणजे अत्यंत लांच्छनास्पद घटना घडूनही त्यावर संबंधित अनियंत्रित माध्यमांवर कोणताही मुलाहिजा न बाळगता सविस्तर चर्चा घडवून आणल्या जात आहेत आणि माथी भडकावण्याचे काम सुरूच आहे. कुठे जाती शोधण्याचा प्रयत्न होतोय तर कुठे विचारधारा आणि तिचे कुळ आणि मुळापर्यंत जाण्याचा प्रकार सुरू आहे.

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे गवईंच्यावर हल्ल्याचा प्रयत्न मुळात अशाच विखारी अपप्रचार आणि सामग्रीतूनच उत्पन्न झाला. आपला देश मोठा आहे, असंख्य हातात स्मार्ट फोन आहेत. अगदी नेमकेपणाने सांगायचे झाले तर 80 ते 90 कोटी लोकांकडे ते असावेत. त्यावर अव्याहतपणे मजकुराची त्सुनामी सुरू आहे. काही पापभिरू लोक शुभेच्छा संदेशासाठी आणि व्यक्तिगत मनोरंजनासाठी या माध्यमाचा वापर करतात. तथापि, मोठा वर्ग किंवा गट असा आहे की तो त्यांच्या स्वतःच्या नकळत त्यांच्या वापरकर्त्यांच्या हातचे बाहुले बनला आहे. न्या. गवई पदावर आल्यापासून त्यांनी संविधानाच्या संदर्भात विधाने केली.

जी केली ती संविधानाच्या चौकटीत केली आणि संविधानाच्या बलस्थानांची साक्ष देणारी केली. देशातल्या विविध माध्यमांत आणि कार्यक्रमातच नव्हे तर परदेशातही त्यांनी केली. त्यांची हीच भूमिका त्यांच्या अलीकडच्या निवाड्यांमध्येही दिसली. हा देश संविधानाच्या चौकटीनुसारच चालतो हे त्यांचे परदेशातील भूमीवर केलेले विधान लक्षवेधी ठरले. त्यांचे पूर्वसुरी न्या. डी. वाय. चंद्रचूडही बऱ्याच कार्यक्रमांत आणि मंचांवर बोलायचे. दोन्ही न्यायाधीश जे बोलले ते कायद्याला धरून आणि संविधानाच्या चौकटीतच. मात्र विटंबना अशी की चंद्रचूड यांनाही लक्ष्य करणारे कथित विचारवंत वेगळे होते अन आता गवई यांना लक्ष्य करणारे वेगळे. त्यात उजवे-डावे आणि सगळ्याच रंगांचे लोक आपापल्या वकुब आणि सोयीनुसार भूमिका घेत बेबंदपणे आपले विचार मांडते झाले.

केवळ न्यायाधीशच नव्हेत, तर साहित्यिक आणि राजकीय मंडळी सगळेच या मीडिया ट्रायलला सातत्याने सामोरे जात आहेत. निवडणूक आयोगापासून ते संसदेपर्यंत आणि विरोधी पक्षनेत्यापासून पंतप्रधानांपर्यंत प्रत्येक घटनात्मक संस्था अथवा घटनात्मक पदावरील व्यक्ती या अशाच निरंकुश शाब्दिक हल्ल्यांना बळी ठरले आहे. हे हल्ले केवळ सोशल मीडियातील फिरवाफिरवीपर्यंत असते तर तेही एकवेळ चालण्यासारखे होते. मात्र त्यातून असंख्य लोकांची जी मने कलुषित केली जात आहेत ते घातक असून त्यातून भविष्यात अशा स्वरूपाच्या चीड आणणाऱ्या आणि मान खाली घालायला लावणाऱ्या घटना घडतच राहतील.

अत्यंत व्यक्तिगत स्वरूपाचे हल्ले, अत्यंत आक्षेपार्ह टीका आणि टिप्पणी, शिवीगाळ आणि चारित्र्यहनन, इतिहासातील थोर नेत्यांचेही प्रतिमाभंजन आणि किळस वाटावा असा त्यांच्याबद्दल आणि त्यांच्या कुटुंबाबद्दलचा घाणेरडा प्रचार राजरोस सुरू आहे. माध्यमांवर परस्परविरोधी विचारांचे गट परस्परांवर तुटून पडत असले तरी त्यात अब्रू जातेय ती देशाची आणि लोकशाहीची. हे सगळे वेळीच रोखा म्हणायची वेळही आता गेली आहे. मात्र त्याचा बिमोड निश्चितच व्हायला हवा.

पान १ वरून

## 'डीजेमुक्ती'नंतर सोलापूर शहर...

जाहीर केलेली मदत विसंगत असून ती शेतकऱ्यांची चेष्टा आहे.' त्यांनी पुढे सांगितले, 'अब्जावधी रुपयांचे करबुडवे उद्योगपतींना सवलती देणारे हेच सरकार, पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी एक पैसाही खर्च करत नाही. ही लाजिरवाणी बाब आहे.' सकाळी ११ वाजता जिल्हा परिषद पूनम गेट येथून बैलगाड्यांसह मोर्चा निघाला. शेतकऱ्यांनी आपल्या जनावरांना तेथेच बांधून सरकारच्या विरोधात घोषणाबाजी केली. पूरामुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांनी ज्वारीची भाकरी व खर्डा खाऊन प्रतीकात्मक निषेध नोंदविला. त्यानंतर मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला, मात्र पोलिसांनी प्रवेशद्वारावरच अडविले. सीटूचे राज्य उपाध्यक्ष कॉ. युसुफ शेख (मेजर) यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. यावेळी राज्य महासचिव कॉ. एम.एच. शेख यांनी सांगितले की, 'सोलापूर जिल्ह्यात १०० वर्षातील सर्वात प्रचंड अतिवृष्टी झाली. भीमाङ्गसीना नदीला आलेल्या पुरामुळे गावे वाहून गेली. महाराष्ट्रातील सुमारे ८० लाख हेक्टर शेती उद्ध्वस्त झाली असून १५० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. शहरी भागातही जनजीवन विस्कळीत झाले आहे.' त्यांनी म्हटले, 'शेतकरी हा अर्थव्यवस्थेचा कणा आहे. या संकटातून उभे राहण्यासाठी सरकारकडून किमान दहा वर्षांची पुनर्बांधणी योजना आवश्यक आहे.' यावेळी कॉ. नलिनीताई कलबुर्गी, व्यंकटेश कोंगारी, सुनंदाताई बल्ला, शेवंताताई देशमुख, कॉ. विल्यम ससाणे, सुभाष बावकर, सुलेमान शेख, राजेंद्र स्वामी, मल्लिकार्जुन नाव्ही, दयानंद फताटे, उमेश पाटील, सदाशिव साळुंके, विश्वनाथ बसवेश्वर, श्रीशैल बुगडे आदींची उपस्थिती होती. प्रजा नाट्य मंडळाच्या शाहिरांनी शेतकऱ्यांच्या जीवनसंघर्षाला भिडणारी गीते सादर करून उपस्थितांना भावनिक केले.

**प्रबोधन**

# जागर बुद्धीचा । हवा सदोदित

सीमोल्लंघन हा दसरा सणातील महत्त्वाचा उपक्रम असेल, तर दसऱ्याची गौरवमूर्ती श्रीरामाला मर्यादापुरुषोत्तम म्हणणं, हे विसंगत बोलण्याचं अर्थात वदतो व्याघाताचं उत्तम उदाहरण म्हणावं लागेल. त्याऐवजी रामाला अमर्यादा पुरुषोत्तम म्हणावं, तर त्याने समुद्रबंदी मोडून सीमोल्लंघन केलं; शबरीची उष्टी बोरं खाऊन स्पृश्यास्पृश्य भेदाचं सीमोल्लंघन केलं; स्त्रियांना तुच्छ लेखणाऱ्या स्मृतिवचनाचं सीमोल्लंघन करून सीतेच्या आत्मसन्मानाचं रक्षण केलं आणि ज्येष्ठ पुत्र हाच राजा होऊ शकतो, ह्या राजनीतीचं सीमोल्लंघन करून आपल्या कनिष्ठ भावाकडे राज्यही सोपवलं. रामाच्या या मयार्दातिक्रमाचा अर्थ नीट लागू शकतो. हे सारं लक्षात घेऊन साने गुरुजी म्हणतात, 'राम आर्य-अनार्य पाहात नाही. तुडवले जाणारे जे जीव त्यांना राम बघतो. त्यांचा कैपक्ष घेतो, आणि जे तुडवणारे असतात, त्यांचा निःपात करतो. तुडवणारे कुणीही असोत. हिंदू-मुसलमान, इंग्रज, जपानी, राम दोनच वर्ग ओळखतो. पददलित व मदोन्मत्त. तो पददलितांची बाजू घेऊन उठेल.' याचा अर्थ, महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील रामराज्य जर साकार करायचं असेल, तर श्रुति-स्मृतिवचनं, रूढी- परंपराजन्य अनुचित मयार्दा, जातिभेदजन्य सीमा, भ्रमिष्ट लोकधारणा आणि अगदी आजच्या काळातील समतास्थापनेच्या मागार्तील जागतिक स्तरीय अर्थकारण, समाजकारण, राज्यव्यवस्था, धर्मकारण यांचं सीमोल्लंघन आपणास करावं लागेल.

सीमोल्लंघनाचा संदेश हाच दसरा सणाचा इत्यर्थ. पण हा संदेश कुणीही गंभीरपणे कधीच समजून घेत नाहीत. दसऱ्याला गावाची सीमा ओलांडायची आणि परत आपल्या घरी परतायचं, हाच कार्यक्रम शेकडो वर्षांपासून शेकडो पिढ्यांनी राबवला. पण फलप्राप्ती काय? तर भोपळ्याएवढं शून्य! आपण सीमोल्लंघन का करायचं? कोणत्या सीमा कोठे असतात? सीमेच्या पलीकडे का जायचं? सीमोल्लंघनाचा वाच्यार्थ कोणता? लक्ष्यार्थ कोणता? व्यंग्यार्थ कोणता? सीमा कोणकोणत्या प्रकारच्या असतात? कोणत्या सीमोल्लंघनात पुरुषार्थ असतो? ओलांडू नयेत अशा सीमा कोणत्या? याचा विचार करणारे लोक मोजकेच असतात. समाज, नीती, व्यवहार यांच्या संदर्भात, महापुरुषांनी केलेल्या सीमोल्लंघनाच्या संदर्भात विचार करणारे तर आणखी कमी भरतात. पण आपल्या चिंतनाला खाद्य पुरवण्याची आनंददायक क्षमता दसरा सणाच्या उपक्रमात असते. म्हणूनच एका कवीने दसऱ्याचं यथार्थ वर्णन करताना म्हटलं, दसरा सण मोठा । नाही आनंदा तोटा ।।

भारताच्या इतिहास ग्रंथांच्या काही मोजक्या पृष्ठांमध्ये थोर पुरुषांनी केलेली काही सीमोल्लंघनं दडलेली आहेत. त्यांचा शोध आजही नक्कीच आनंद देणारा आहे. क्षत्रिय विश्वामित्र आणि राजा जनकाने अनुक्रमे ब्रह्मर्षी आणि विदेही या पदव्या प्राप्त केल्या. भारतीय तत्त्वज्ञानाला महात्मा चार्वाकाने परलोकवादाचं सीमोल्लंघन करून इहवादाच्या सुखद प्रांतात आणून सोडलं. हिंदू धर्माच्या त्रासातून लोकांना मुक्त करण्यासाठीच महावीरांनी जैनधर्म, गौतम बुद्धांनी बुद्धधर्म, चक्रधरांनी महानुभाव संप्रदाय, महात्मा बसवेश्वरांनी वीरशैव लिंगायतधर्म, ज्ञानदेव- नामदेवांनी वारकरी संप्रदाय स्थापन केला. महापुरुषांनी केलेल्या ह्या सीमोल्लंघनाने जनजीवन मोकळा श्वास घेऊ लागले. चक्रधरांनी संस्कृत भाषेच्या अस्मात - कस्मात्चा त्याग करून लोकभाषा मराठीत साहित्यरचना करण्याचा आदेश दिला. तेहत्तीस कोटी देवांच्या प्रांताचं सीमोल्लंघन करून कबीर अज्ञेयवादी झाले. त्यांचा प्रभाव पडल्यामुळे गुरू नानक निरीश्वरवादी झाले. शीख आपले आठ गुरू आणि त्यांची वचनं असलेल्या ग्रंथ साहेबाखेरीज काही मानत नाहीत. राजकीय क्षेत्रात छत्रपती शिवराय यांनी मनुस्मृतीजन्य दूषित क्षेत्राबाहेर पडून सिंधूबंदी मोडली, जातिभेद झिडकारले, सैन्यात सर्व जातींच्या लोकांचा समावेश केला आणि शास्त्री पंडितनिर्मित यवन, म्लेंच्छ शब्द धुडकावून त्यांच्यातील वीरांचा उपयोग स्वराज्यनिर्मितीसाठी करून घेतला.

सतीप्रथेचं निर्मूलन करणारे राजा राममोहन रॉय आणि स्त्रीशिक्षणाचा प्रारंभ करणारे महात्मा फुले, रामकृष्णांचा विरक्त धर्म बाजूला ठेवून भारतीयांच्या ऐहिक समृद्धीचा आग्रह करणारे स्वामी विवेकानंद आणि अस्पृश्योद्धारक महर्षि विठ्ठल रामजी शिंदे, महात्मा गांधी, छत्रपती शाहू महाराज, मनुस्मृतीचा जळजळीत निषेध करणारे डॉ. आंबेडकर ही सर्व माणसं 'सीमोल्लंघनवीर' या शब्दाने गौरवली गेली पाहिजेत.

पण आज आपण पुन्हा पुराणमताभिमानी होण्यात धन्यता मानू लागलोय, हे खेदजनक वास्तव आहे. रूढी, प्रथा, परंपरांच्या प्रेतांना कवटाळण्यासाठी आटापिटा करीत आहोत. महापुरुषांच्या उक्ती आणि कृतीचा सोयीस्कर प्रतिगामी अर्थ काढत आहोत. ही परागती आहे. सनातनी संस्कृतीचा भ्रम आपणाला चैतन्यहीन करीत आहे. नवचैतन्य, नवस्फूर्ती नसलेले लोक म्हणजे मढी! पु.ल.देशपांडे व्यथितपणे म्हणतात, 'या देशात फक्त जुने मुडदे सडतात आणि नव्या मुडद्यांना जागा करून देतात. मुडदे कधी कोणाची अपेक्षापूर्ती करतात का?' अशा वेळी महापुरुषांचं वारंवार चिंतन केल्याशिवाय खरं सीमोल्लंघन घडणार नाही. म्हणून-

सीमोल्लंघन करा । बंधूंनो रूढींचे
रीतीरिवाजांचे । जीर्णशीर्ण ॥१
सीमा दुःखाच्या। ओलांडाव्या कष्टाने
आयुष्याचे सोने । होण्यासाठी ॥२
जाचक धमार्ला । टाकूनिया मागे
समतेच्या मार्गे । पुढे चला ॥ ३
जातीच्या भेदांना । चला उल्लंघून
भाऊ सारेजण । एक आम्ही ॥४
द्वेष मत्सराचे । क्षेत्र ओलांडावे
पुढे पुढे जावे । प्रेमभावे ॥५
जागर बुद्धीचा । हवा सदोदित
स्वार्थामुळे अंत । होणे टाळा ६
विवेक - घटांची । स्थापना करावी
कधी न चळावी । कुसंगाने ॥७
क्षणोक्षणी साधा। गती नि प्रगती
सीमाबद्ध होती । दुर्दैवी ते ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

**प्रबोधन**

# सर्वांचे आयुष्य । सोन्यापरी व्हावे

केशवसुताचा सच्चा चेला असा स्वतःचा अभिमानपूर्वक उल्लेख करणाऱ्या गोविंदाग्रज ऊर्फ राम गणेश गडकरी यांनी ऑक्टोबर १९३१मध्ये समाजसुधारणेसाठी दसरा ही कविता लिहिली. चालू २०१२हे या कवितेचं जन्मशताब्दी वर्ष आहे. आपल्या कवितेचा मथितार्थ लिहिताना गोविंदाग्रजांनी रूढींचं सीमोल्लंघन हाच समाजाचा दसरा असं म्हटलं आहे. पहिल्या चार ओळीत चला आज हा आला दसरा। पाऊल पुढते टाकायला । सीमोल्लंघन करावयाला। आनंदाने नाचायला। सणांमध्ये सण हाच खरा । असा दसरा सणाचा बहुमान केला असला, तरी आज ह्या कवीने काय म्हटलं असतं? ते म्हणाले असते, व्यर्थ आज हा आला दसरा। पाऊल पुढती पडले नाही। सीमोल्लंघन झाले नाही । रुढिबद्धता मोडत नाही। सणाला उरला नसे चेहरा कारण गेल्या शंभर वर्षात आपण हजार वर्षांनी मागे गेलो आहोत. स्वामी विवेकानंदही भारतीयांचा अधःपात नोंदवताना म्हणतात, 'हिंदू धर्माइतकी तत्त्वं सांगणारा दुसरा धर्म नाही आणि हिंदू लोकांइतके आचारात अनुदार लोकही अन्यत्र सापडणार नाहीत!'

दसरा हा नव्या धान्याचं स्वागत करतो. नव्या अन्नाचं सेवन केलं, की नवे विचार अंकुरित झाले पाहिजेत. कवी गोविंदाग्रज म्हणतात, चला रूढिवर आता घसरा। टाळुनि सीमा मृतधर्माच्या। दंभाच्या वा अंधपणाच्या। जुनेपणाच्या, अहंपणाच्या। सीमोल्लंघन कालचि दसरा। आपण मात्र टाकाऊ रूढी, मृत धर्म, धर्मांध वृत्ती, जुनं तेचं सोनं मानण्याचा गर्व यांना चिकटून बसलो. नवे अन्न पोटात आणि जुने विचार डोक्यात, अशी आपली आज स्थिती झाली आहे. स्वामी दयानंद सरस्वती आर्य समाजाचे प्रवर्तक होते. महात्मा फुले सत्यधमचि प्रवर्तक होते. प्राचीन विद्वानांनी समाजहित जपलं. पण कर्मठ-सनातनी पुढाऱ्यांनी देवी- देवतांच्या घरगुती पूजेला सार्वजनिक रूप देऊन समाजहिताचा सत्यानाश केला. भारतात देवी- देवतांचं होणारं बीभत्स, किळसवाणं कौतुक पाहून साने गुरुजी म्हणतात, 'पापी भक्तांच्या दानाने व दर्शनाने आमच्या देवमूतीर्ही बाटल्या आहेत. देवच भ्रष्ट झाल्यावर त्यांची शुद्धी कोण करणार? भूदेव ब्राह्मण?' भारतीय समाज मध्ययुगात चालला आहे हेच खरं! दसरा सण आता नवरात्रौत्सव या नावाने चंगळवाद्यांना गुलाबी स्वप्नांचा खजिना आणून देत आहे; इंद्रिय सुखाची लयलूट धार्मिकतेच्या, संस्कृतीच्या बुरख्याखाली नवकुबेरांना, त्यांच्या पिलावळीला उपलब्ध करून देत आहे. रासदांडियानंतर गर्भपात केंद्र का समृद्ध होतात, हे धर्मनिष्ठांनाच विचारलं पाहिजे. द्रव्यलोभी दूरचित्रवाहिन्या आणि त्यांचं शेपूट धरून चालणारी टुकार पत्रकारिता करणारे मृत धर्माच्या, निर्लज्ज धार्मिक चंगळवाद्यांच्या टाळूवरचं लोणी चाटूनपुसून या काळात लठ्ठ होतात. माफिया भक्तसुद्धा साईबाबा, दुगार्माता, सिद्धिविनायकाला तुडुंब दान देऊन कृतार्थ होतात. साने गुरुजी म्हणतात, 'लोकांना छळून पिळून आणलेले हिरे देवाला कसे सहन होतील? ते घाणेरडे हिरे घाणीतच जाणार! झब्बू लोक हिरे देणाऱ्यांची वर्तमानपत्रातून धर्मात्मा म्हणून स्तुती करतात, पण गरिबांची वर्तमानपत्रं असती तर त्यांनी काय लिहिलं असतं?' गोविंदाग्रजही तेच म्हणतात, श्रुतिस्मृतींना आता विसरा । अंधभक्तीचा पांगुळगाडा। मोडुनि तोडुनि उपडा पाडा । पातळी तो नेऊनि गाडा । करा साजरा यापरि दसरा । असा दसरा सण साजरा करण्याची हिंमत आज आपणात आहे का? समाजात वाढणाऱ्या अंधभक्तीला आपण कायद्याने आळा का घालू शकत नाही? धार्मिक कट्टरपणा हा दखलपात्र गुन्हा का होत नाही? गोविंदाग्रजांच्या काळात शिक्षणप्रसार फारसा नसून ते अंधभक्तीला प्रखर विरोध करतात आणि आपण देवस्थानांना, मंदिरांना झेड प्लस सुरक्षा देऊन राज्यघटनेचा अपमान करीत आहोत. हे प्रतिगामी सीमोल्लंघन कधी थांबवणार?

दसरा हा नवमत प्रसारासाठीच असतो. मानवतेच्या प्रसारासाठी असतो. अजूनही खंडेनवमीला शस्त्रपूजा केली जाते. पण काठ्या, कुऱ्हाडी, तलवारी ही नव्या युगाची शस्त्रं म्हणून ज्या देशात पुजली जातात; तो देश, त्याच्या रूढी, त्यामागील मानसिकता मागासलेली आहे, हे सिद्ध होते. रावणाचा पुतळा जाळण्यातसुद्धा आधुनिक रावणच पुढाकार घेतात, हे आपण लक्षात घ्यायला हवं. चित्रपट, कथा- कादंबऱ्यातील अश्लीलता आता पराकोटीला पोहोचली आहे. दारूपेक्षा अधिक धुंद करणारी दूरचित्रवाहिन्यावरील स्त्रियांची वेशभूषा हा चिंतेचा विषय आहे. मालिकांमधून शय्याचित्रं (Bed Scences) दाखवण्यावर बंदी नसल्यामुळेच रावणनिर्मितीला चालना मिळते, असं म्हणावं लागेल. समाज दुर्व्यवहारांच्या सीमा ओलांडून खूप पुढे गेला, हे शासनालाही कळेनासं होणं, हे गंभीर वास्तव आहे. समाजाची खालावणारी नीतिमत्ता हे अराजकाचं सूचक असतं आणि सार्वत्रिक शिक्षणप्रसार हाच त्यावर एकमेव उपाय असतो. अशा वर्तमानात विजयादशमी - दसऱ्याला केवळ सोने घ्या, सोन्यासारखे राहा, असं म्हणून चालणार नाही, तर तशी आपल्या प्रत्येक देशबांधवाची व्यवस्था करणं, हे प्रत्येक सुस्थितीशील माणसाचं कर्तव्य आहे, अन्यथा आपट्याची पानं आपणाला आपटल्याशिवाय राहाणार नाहीत. कारण-

दसऱ्यासारखा । सण न दुसरा
शत्रुत्वाला थारा नाही तेथे ॥ १
जातपात भेद । मागे टाकूनिया
सीमा ओलांडाया । सज्ज व्हावे ॥ २
अज्ञानाची सीमा । रोज ओलांडावी
ज्ञानभेट घ्यावी । अहोरात्र ॥ ३
गरिबीची सीमा । न ये ओलांडता
स्थापावी समता । संपत्तीची ॥४
जगाची समृद्धी । सर्व समाजाची
मालकी एकाची । नको तेथे ॥५
सर्वांचे आयुष्य । सोन्यापरी व्हावे
दुःख दैन्य जावे । दूर दूर ॥ ६
आपट्याची पाने । व्हावीत सोन्याची
आपटी खाण्याची । सोय नको ॥७



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

## जयहिंद विद्यालय येथील विद्यार्थ्यांचे दैदीप्यमान यश



**कसबे तडवळे (कटूसत्य वृत्त):-** धाराशिव जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेमध्ये 19 वर्ष वयोगटात उंच उडी (High jump) या स्पर्धेमध्ये इयत्ता 11 वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या स्वप्निल धनाजी तोडकर यांनी जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला. तर 19 वर्ष वयोगटातील मुलींच्या बांबु उडी या स्पर्धेमध्ये प्रगती रामचंद्र पवार यांनी जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला

यापूर्वी झालेल्या किक बॉक्सिंग स्पर्धेमध्ये 17 वयोगटातील मुलांच्या स्पर्धेत 60 किलो खालील वजन गटात आदित्य बाबासाहेब मिसाळ यांनी जिल्ह्यात प्रथम क्रमांक तर 0 ते 40 किलो मधील वजनगटात मुलींच्या स्पर्धेत स्वराली सौदागर होगले यांनी प्रथम क्रमांक मिळवला.

19 वर्ष वयोगटातील जिल्हास्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेमध्ये 0 - 48 किलो वजन गटात अर्जुन अनिल कळवंडे यांनी प्रथम क्रमांक मिळवला. तर

19 वर्ष वयोगटातील मुलींच्या 0 - 48 किलो वजन गटातील किक बॉक्सिंग स्पर्धेमध्ये लक्ष्मी आश्रम इंगळे यांनी प्रतिस्पर्ध्यांशी झुंज देत प्रथम क्रमांक मिळवला.

नांदेड जिल्ह्यामध्ये पार पडलेल्या बॉक्सिंग स्पर्धेमध्ये अनुज तानाजी तोडकर यांनी 0 ते 48 किलो वजन गटात सहभाग नोंदवला.

धाराशिव जिल्हास्तरीय विविध स्पर्धेतून लातूर विभागीय स्तरावर निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, जनरल सेक्रेटरी पि.टी. पाटील खजिनदार बापू शितोळे जॉईंट सेक्रेटरी अरुण देबुडवार स्कूल कमिटीचे चेअरमन टी. पी. शिनगारे व विद्यालयाचे प्राचार्य श्री पाटील एस. एस. तसेच प्राध्यापक, प्राध्यापिका शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी क. तडवळे चे सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थ यांनी देखील यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापक पठाण आय. एल. याचे अभिनंदन केले.

## ऑगस्टच्या नुकसान भरपाईचे ६० कोटी...

यामध्ये संपूर्ण प्रशासन अडकले. यामुळे तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांना शेतकऱ्यांची खाती ऑनलाईन टाकण्यास विलंब होत आहे. गुरुवारी दुपारपर्यंत जिल्ह्यातील २२ हजार ७३४ बँक खाती ऑनलाईन झाली, तर त्याची रक्कम २४ कोटी ४० लाख ४८ हजार रुपये होतात.

त्यापैकी ११६७ शेतकऱ्यांच्या खात्यावर ९६ लाख ८६५ रुपये जमा झाल्याचे सांगण्यात आले. २१ हजार ७५१ शेतकऱ्यांचे २३ कोटी ४१ लाख केवळ ई-केवायसी केली नसल्याने पैसे जमा होत नाहीत.

**जुन्या निकषानुसार मदत..**

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रति दोन हेक्टरपर्यंत जिरायत प्रति हेक्टर आठ हजार पाचशे, बागायत १७ हजार, तर फळबागांसाठी बावीस हजार पाचशे प्रमाणे रुपयाने पैसे जमा केले जात आहेत.

पंढरपूर तालुक्यातील ११५४, उत्तर तालुक्यातील दहा, तर दक्षिण सोलापूर तालुक्यातील तीन शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा झाले आहेत.

मंजूर ६० कोटींमध्ये उत्तर तालुक्यात सर्वाधिक २६ कोटी तीन लाख, अक्कलकोट तालुक्यात १४ कोटी चार लाख, दक्षिण सोलापूर तालुक्यासाठी १२ कोटी १४ लाख रुपये, तर पंढरपूर तालुक्यासाठी चार ७० लाख ५० हजार रुपये मंजूर आहेत. इतर तालुक्यासाठी यापेक्षा कमी रक्कम ऑगस्ट महिन्यातील नुकसानीची मंजूर आहे.

## ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीनं संपर्कमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांचा सन्मान



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने संघटनात्मक बांधणी तसेच पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना बळ मिळावे या उद्देशाने राज्यातील विविध जिल्ह्यांसाठी संपर्क मंत्र्यांची नियुक्ती करण्यात आले आहेत. सोलापूर शहर जिल्हा संपर्कमंत्री म्हणून राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांची गुरुवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जबाबदारी सोपवली. सोलापूर सह धाराशिव, वाशिम आणि जालना या जिल्ह्याचे देखील संपर्कमंत्री म्हणून त्यांना जबाबदारी सोपविण्यात आली आहे. दरम्यान नूतन संपर्क मंत्री तथा कृषिमंत्री दत्तात्रय भरणे हे शुक्रवारी सोलापूर शहरात एका कार्यक्रमाच्या निमित्ताने आले असता सोलापूर विमानतळ येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीनं सोलापूरच्या मानाचा आजोबा गणपतीची प्रतिमा शाल पांघरून त्यांच्या पुढील कारकीर्दीस शुभेच्छा देत त्यांचे शुभ आशीर्वाद घेतले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ग्रामीण जिल्हाध्यक्ष उमेश पाटील, राष्ट्रवादी शहर जिल्हा अध्यक्ष संतोष पवार,माजी नगरसेवक तथा प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, माजी नगरसेवक तौफिक शेख, माजी नगरसेवक गणेश पुजारी, प्रदेश सचिव इरफान शेख, युवती अध्यक्ष किरण नारायण माशाळकर, माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, सायरा शेख, राष्ट्रवादी अल्पसंख्यांक विभागाचे रियाज शेख,यश अभय कुमार कांती, सचिन अंगडीकर, शहर संघटक माणिक कांबळे,वसंत कांबळे, महादेव राठोड,आनंद गाडेकर,अविनाश भडकुंबे आदिंसह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते यांची उपस्थिती होती. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांनी राज्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांना बळ देण्याच्या उद्देशाने राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये संपर्क मंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले आहे या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संघटनात्मक बांधणी करण्यात येणार आहे.सोलापूर जिल्ह्याचे नूतन संपर्कमंत्री दत्तात्रय भरणे यांना सोलापूर जिल्ह्याचा संपूर्ण अभ्यास असून त्यांच्या माध्यमातून सोलापूरच्या विकासाला चालना मिळेल. यापूर्वी देखील सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून विकासात्मक कार्य केले आहेत या पुढील काळात देखील विकासाच्या दृष्टीने ते प्रयत्न करतील अशी आशा यावेळी प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी व्यक्त केली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर येणाऱ्या काही दिवसांमध्ये सोलापूर शहर जिल्ह्याचा दौरा करून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या तळागाळातील कार्यकर्त्यापर्यंत पोहोचण्याचे उद्देश असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला आगामी निवडणुकीत अव्वल स्थानी राहण्यासाठी आपला सोलापूर जिल्हा दौरा नियोजित करण्यात येणार असल्याचे यावेळी नूतन संपर्क मंत्री दत्तात्रय भरणे यावेळी म्हणाले. सोलापुरातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश पदाधिकारी, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते आणि कार्यकर्त्यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अनुषंगाने पक्ष बळकटीसाठी जोमाने कामाला लागावे अशा सूचना देखील यावेळी भरणे यांनी दिला.

**वात्रटिका**

### महिला आरक्षण

वेध लागले निवडणुकीचे
पुरूषांची बाही फुरफुरली...
पण आरक्षण सोडती मध्ये
महिलांनी बाजी मारली...
इथे तिथे पाहिल जिथे
महिला आरक्षण दिसले...
गुडघ्याला बाशिंग बांधून
जे होते ते हिरमुसले...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# पूरग्रस्तांची हाक — मदतीचा निर्णय अजून थांबलेलाच!



**पोखरापूर (कटूसत्य वृत्त) :** अतिवृष्टी आणि पुराच्या तडाख्याने मोहोळ तालुक्यातील शेतकऱ्यांचे संसार अक्षरशः उद्ध्वस्त झाले असून, शासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी, या मागणीसाठी 'महाराष्ट्र राज्य जनहित शेतकरी संघटनेच्या' वतीने मोहोळ तहसील कार्यालयासमोर तीव्र धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर देशमुख यांनी केले.

वाघोली, पेनूर, पाटकूल, तसेच सीना व भोगावती नदीकाठच्या गावांतील शेतक-यांचे पिके, फळबागा, जमीन, मोटारी, ठिबक सिंचनाच्या यंत्रणा आणि घरातील साहित्य पूरपाण्यात वाहून गेले आहे. 'या प्रचंड नुकसानीचा पंचनामा करून शासनाने फळबागांसाठी हेक्टरी १.५० लाख आणि इतर पिकांसाठी ₹१ लाख मदत जाहीर करावी,' अशी मागणी देशमुख यांनी केली.

देशमुख पुढे म्हणाले, 'सीना, भोगावती आणि भीमा-नागझरी नदीला आलेल्या पुरामुळे शेतक-यांना पुढील पाच वर्षे आर्थिक संकटाचा सामना करावा लागेल. शासनाने तातडीने २.५ लाखांपर्यंत बिनव्याजी कजार्ची सोय करून बँकांना आदेश द्यावेत. तसेच पूरग्रस्त शेतक-यांच्या मुलांची शैक्षणिक फी माफ करावी.'

आंदोलनादरम्यान 'शेतक-यांना न्याय द्या', 'पूरग्रस्तांचा पंचनामा करा', 'सरकार जागे व्हा' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनाला जिल्हाध्यक्ष नाना मोरे, भाऊसाहेब पाटील, शिवाजी जाधव, बिरू वाघमोडे, सचिन आवताडे, सिद्राम वाघमोडे, विनायक सरवदे, समाधान घुले, आकाश खरात, रमेश डोके, औदुंबर हाके, पिंटू पवार, सुरेश पवार, बाळासाहेब आढेगावकर, सुबोध मोटे, बिभीषण सरवदे, नाना वाघमोडे, पंजाब करंडे, किरण वसेकर आदींसह शेकडो शेतकरी उपस्थित होते.

**थकीत कर्ज माफ करावे**

राष्ट्रीय बँका, पतसंस्था आणि मल्टीस्टेट बँकांमधील सर्व पिककर्जे व दीर्घ मुदतीच्या (पाईपलाईन) योजनांचे थकीत कर्ज तात्काळ माफ करण्यात यावे, अशी ठाम मागणी जनहित शेतकरी संघटनेने केली आहे.

# द्राक्ष बागायतदार संघटनेच्या मागण्या शासनस्तरावर स्वीकारणार - कृषीमंत्री भरणे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सध्या शेतकऱ्यांना बहुतांश अडचणींचा सामना करावा लागत आहे. मी स्वतः द्राक्ष बागायतदार असून मला द्राक्ष बागायतदारांच्या समस्यांची जाण आहे. आजच्या चर्चासत्रात द्राक्ष बागायतदार संघटनांकडून करण्यात आलेल्या सर्व मागण्या शासनस्तरावर स्वीकारणार असून त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी यावेळी केले.

महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघ आयोजित द्राक्षावरील फळ छाटणी चर्चासत्राचे उद्घाटन दीपप्रज्वलन करुन कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते झाले. यावेळी राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे अध्यक्ष कैलासराव भोसले, उपाध्यक्ष मारुतराव चव्हाण, संघटनेचे खजिनदार शिवाजी पवार, जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, उपविभागीय कृषी अधिकारी रामचंद्र माळी, जिल्ह्यातील द्राक्ष बागायतदार इत्यादी उपस्थित होते.

कृषीमंत्री भरणे म्हणाले, मी स्वतः द्राक्ष बागायतदार आहे. त्यामुळे द्राक्ष बागायतदाराच्या अडीअडचणी मला माहित आहेत. अतिवृष्टीने झालेले बागायतदार शेतकऱ्यांचे नुकसानीसाठी पॅकेज क्रॉप कव्हर अनुदान यासह या चर्चासत्रात ज्या काही मागण्या द्राक्ष बागात दराने केलेल्या आहेत त्या सर्व मागण्यांचा स्वीकार करून त्या मागण्या शासन स्तरावर सकारात्मक दृष्टीने मांडून बागायतदाराच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी कृषी मंत्री भरणे यांनी महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाच्या कामाचे कौतुक केले. तसेच संघटनेच्या वतीने आयोजित हे चर्चासत्र म्हणजे द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांसाठी खऱ्या अर्थाने मेजवानीच असल्याचे त्यांनी सांगितले. या चर्चासत्राचा उपयोग करून शेतकऱ्यांनी आपल्या शेतामध्ये नाविन्यपूर्ण प्रयोग करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

प्रारंभी द्राक्ष बागायतदार संघटनेचे अध्यक्ष भोसले यांनी सीना नदी पूरग्रस्त भागातील शेतकऱ्यांसाठी विशेष पॅकेजची तरतूद करावी, 10 एचपी मोटारीसाठी वीज मोफत द्यावी, क्रॉप कव्हर साठी 50 टक्के अनुदान अशा मागण्या करून त्या शासनाने सोडवाव्यात अशी अपेक्षा व्यक्त केली.

# पदवीधर-शिक्षक मतदार नोंदणीचा कार्यक्रम सुरु

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदार संघासाठी दक्षिण सोलापूर तालुक्यामध्ये मतदार नोंदणीला प्रारंभ झाला आहे. मतदार नोंदणीची शेवटची तारीख ६ नोव्हेंबर २०२५ आहे. या तारखेपूर्वी दोन्ही मतदार संघांकरिता पात्र व्यक्तींनी अर्ज करावेत असे आवाहन पदनिर्देशित अधिकारी सुमित शिंदे यांनी केले आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पुणे विभागाच्या पदवीधर व शिक्षक मतदार संध्याच्या निवडणूकांकरिता ०१ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित नवीन मतदार याद्या (de-novo) तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यासाठी सोलापूर शहरामध्ये पदवीधर मतदार संघाकरिता 6 मतदान केंद्रे आणि शिक्षक मतदार संघाकरिता 6 मतदान केंद्रे तयार करण्यात आलेली आहेत. पदवीधर मतदार संघाकरिता फॉर्म नंबर १८ तर शिक्षक मतदार संघाकरिता फॉर्म १९ भरून द्यावयाचे आहे. नियुक्त करण्यांत आलेले पदनिर्देशित अधिकारी खालील प्रमाणे आहेत.

- सुमित शिंदे – उपविभागीय अधिकारी सोलापूर क्र. 2
- किरण जमदाडे – तहसिलदार दक्षिण सोलापूर
- सुजित नरहरे – अपर तहसिलदार मंद्रुप
- जितेंद्र मोरे– नायब तहसिलदार महसूल दक्षिण सोलापूर
- राजाभाऊ भंडारे – निवासी नायब तहसिलदार दक्षिण सोलापूर
- विनायक कुलकर्णी – निवडणूक नायब तहसिलदार दक्षिण सोलापूर

**मतदार नोंदणी कार्यक्रमाचे टप्पे**

सूचना प्रसिद्धी (मतदार नोंदणी अधिनियम, १९६० च्या कलम ३१ (३) नुसार जाहीर सूचना दि. ३० सप्टें २०२५ (मंगळवार) रोजी प्रसिद्ध केली जाईल.

वर्तमानपत्रातील नोटीसची प्रथम पुनर्प्रसिद्धी दि १५ ऑक्टोबर २०२५ (बुधबार) रोजी वर्तमान पत्रात नोटीस पुन्हा प्रसिद्ध केली जाईल.

वर्तमानपत्रातील नोटीसीची द्वितीय पुनर्प्रसिद्धी दि. २५ ऑक्टोबर २०२५ (शनिवार) रोजी नोटीसीची दुसरी पुनर्प्रसिद्धी केली जाईल.

दावे व हरकती स्वीकारण्याचा अंतिम दिनांकः प्रकरणानुसार नमुना १८ किवा १९ द्वारे दावे आणि हरकती स्वीकारण्याचा अंतिम दि.०६ नोव्हेंबर २०२५ (गुरुवार) आहे.

हस्तनिचिते तयार करणे व प्रारूप मतदार याद्यांची छपाईः दि. २० नोव्हेंबर २०२५ (गुरुवार) पर्यंत हस्तलिखिते तयार करणे आणि प्रारूप मतदार याद्याची छपाई करणे अपेक्षित आहे.

प्रारूप मतदार याद्यांची प्रसिद्धी प्रारूप मतदार याद्या दि. २५ नोव्हेंबर २०२५ (मंगळवार) रोजी प्रसिद्ध केल्या जातील.

दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधीः– मतदार नोंदणी अधिनियम, १९६० च्या कलम १२ अंतर्गत दावे व हरकती दि. २५ नोव्हेंबर २०२५ (मंगळवार) ते दि. १० डिसेंबर २०२५ (बुधवार) या कालावधीत स्वीकारल्या जातील.

दावे व हरकती निकाली काढणे व पुरवणी यादी तयार करणेः दावे व हरकती निकाली काढून पुरवणी यादी तयार करणे आणि तिची छपाई दि. २५ डिसेंबर २०२५ (गुरुवार) पर्यंत केली जाईल.

मतदार यादीची अंतिम प्रसिद्धीः मतदार यादीची अंतिम प्रसिद्धी दि ३० डिसेंबर २०२५ (मंगळवार) रोजी होईल.

पात्र मतदारांनी जास्तीत जास्त फॉर्म भरून आपले नांव नोंदवावे. असे आवाहन मतदार यांना करण्यात येत आहे. https://mahaelection.gov.in वेबसाईटवर पदवीधर नोंदणीची सुविधा उपलब्ध आहे. तसेच दोन्ही मतदार संघासाठी ऑफलाईन फॉर्म तहसिल कार्यालय दक्षिण सोलापूर येथील निवडणूक शाखेत उपलब्ध करणेत आले आहे, अशी माहिती पदनिर्देशित अधिकारी पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघ तथा तहसीलदार किरण जमदाडे यांनी दिली.

# आर्द्रा मॉल घेऊन येत आहे सोलापूरकरांसाठी ₹1200 खरेदीवर ₹1 मध्ये साडी- विजय अय्यर



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आर्द्रा मॉल घेऊन येत आहे खास सोलापूरकरांसाठी फक्त 12 ऑक्टोंबर ला दिवाळी ऑफर एक हजार दोनशे (फ₹-1200/-) रुपयाच्या खरेदीवर – फक्त एक रुपया मध्ये साडी, कुर्ती किंवा शर्ट घेता येणार असल्याची माहिती प्रमुख व्यवस्थापक विजय अय्यर यांनी दिली.

सम्राट चौक, नॅशनल हायवे ब्रिजच्या पलीकडे असलेल्या भव्य इमारतीत आर्द्रा मॉल सुरू झाले आहे. काहीच दिवसात सोलापूरकरांच्या पसंतीचे मानबिंदूत झाले आहे. कारण आर्द्रा मॉल फॅमिली वन स्टॉप शोरूम असून यामध्ये सर्वच कुटुंबाकरिता लागणाऱ्या कपड्यांची रेलचेल इथे उपलब्ध आहे. जसे की मेन्स, वुमन्स, किड्स अशा विविध विभागातून सुटींग – शर्टिंग इथेनिक वेअर, ब्रॅण्डेड वेअर, इकॉनोमी वेअर अँड इनर वेअर अशा कपड्यांसह किड्स मध्ये रेडिमेड कपडे उपलब्ध आहेत.

तसेच न्यू बॉर्न बेबींच्या कपड्यासह वुमन्स सेक्शन मध्ये देशातील विविध भागातून नावाजलेल्या सिल्क सारीज, इथेनिक वेअर अँड ड्रेस मटेरियल मोठ्या प्रमाणात आर्द्रा मॉलमध्ये उपलब्ध आहे. चला तर मग आजच आर्द्रा मॉल ला संपूर्ण कुटुंबासह खरेदीला जाऊ आणि या संधीचा लाभ घेऊयात असे आवाहन शुभम भुतडा यांनी केले आहे.

# माजी सैनिकांसाठी 25 ऑक्टोबर रोजी अहिल्यानगर येथे मेळाव्याचे आयोजन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** माजी सैनिक मेळाव्याचे मुख्यालय मेकॅनाईज्ड इन्फंट्री केंद्र व स्कूल अहिल्यानगर येथे शनिवार, दिनांक २५ ऑक्टोबर २०२५ रोजी आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यामध्ये उरऊस्टॉल्स, फ्री चेकअप, फ्री औषधे व हेल्थ सल्ला केंद्र, निवृत्ती, पेंशन व सेवा विषयक अडचणींचे अभिलेख कार्यालय टीम मार्फत त्वरीत निवारण, वीर नारी, वीर माता-पीतांचा सत्कार, प्रमुख बँका व उद्योग संस्थाकडून मार्गदर्शन व नोकरीची माहिती, विविध बँकामार्फत पेंशन अपडेट व नवीन योजना, ई-सेवा व ऑनलाईन सुविधा काउंटर व इत्यादी बाबत सविस्तर मार्गदर्शन करणेसाठी आयोजन केले आहे.

मेळाव्यासाठी जिल्हातील माजी सैनिक, वीर पत्नी/वीर माता-पीता यांना निमंत्रित करण्यात येत आहे. तसेच सोलापूर जिल्हयासाठी चार बसेसची (५५ Seater x ४ Bus) सदर मेळाव्यासाठी जाणे-येण्यासाठी सोय करण्यात आली आहे. मेळाव्यासाठी माजी सैनिकामधून काही स्वतःच्या अडी-अडचणी असतील तर त्या सर्व कागदपत्रानिशी अर्ज स्वतः सोबत घेऊन मेळाव्याचे ठिकाणी सादर करावे असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

तसेच पहिली बस पंचायत समिती कार्यालय अक्कलकोट येथून सकाळी ५ वाजता निघेल व जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय सोलापूर येथे सकाळी ५.३० वाजता पोहचेल. दुसरी बस जिल्हा सैनिक कार्यालय, सोलापूर येथून निघणार आहे. पहिली व दुसरी बस सकाळी ५.३० वाजता अहिल्यानगरला मार्गस्त होतील. तिसरी बस मंगळवेढा बस स्थानक येथून ५ वाजता सुटेल. चौथी बस माजी सैनिक मुलांचे वसतिगृह, सांगोला येथून निघेल. तिसरी आणि चौथी बस माजी सैनिक विश्रामगृह पंढरपूर येथे ५.३० वाजता पोहचतील व अहिल्यानगरला मार्गस्त होतील, असे पत्रकात नमूद आहे. अधिक माहितीसाठी (श्री आप्पासाहेब कोडग, संपर्क क्रमाक ७३८७२५१४०० व श्री बाळासाहेब खराडे, संपर्क क्रमाक ७७४०३००७७) यांचेशी संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# राष्ट्रवादी जिल्हा संपर्क मंत्री ना दत्तामामा भरणे यांचे सोलापूर शहरात जोरदार स्वागत



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय नामदार अजितदादा पवार तसेच प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांनी नुकतेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर एक पत्र काढले असून त्यानुसार वाशिम या जिल्ह्याचे पालकमंत्री व सोलापूर, धाराशिव, जालना जिल्ह्याच्या संपर्क मंत्री म्हणून पक्ष संघटनेच्या दृष्टीने कृषी मंत्री दत्तात्रय मामा भरणे यांना जबाबदारी देण्यात आली आहे.

आज राष्ट्रवादीचे नुतन संपर्क मंत्री राज्याचे कृषी मंत्री नामदार दत्तात्रय मामा भरणे हे द्राक्ष बागायतदार यांच्या कार्यक्रमा निमित्त सोलापूर शहरात आले असता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने सोलापूर विमानतळावर त्यांना शुभेच्छा दिल्या तसेच अभिनंदन करून स्वागत करण्यात आले ..

यावेळी जिल्हाध्यक्ष संतोष पवार कार्याध्यक्ष जुबेर बागवान प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे राष्ट्रवादीचे नेते तौफिक शेख जेष्ठ नेते शफीभाई इनामदार माजी परिवहन सभापती आनंद मुस्तारे अल्पसंख्यांक राष्ट्रीय सचिव फारूक मटके जनरल सेक्रटरी प्रमोद भोसले माजी नगरसेवक गणेश पुजारी युवक कार्याध्यक्ष तुषार जक्का युवती अध्यक्ष किरण माशाळकर महीला प्रदेश सचिव सायरा शेख शहर उपाध्यक्ष सुजित अवघडे मध्य विधानसभा अध्यक्ष आलमेराज आबादीराजे नजीब शेख अदनान शेख वाहतूक आघाडी अध्यक्ष इरफान शेख सहकार सेल अध्यक्ष भास्कर आडकी सोशल मिडीया अध्यक्ष वैभव गंगणे शहर सचिव निशांत तारानाईक सरचिटणीस प्रज्ञासागर गायकवाड दक्षिण विधानसभा कार्याध्यक्ष प्रदीप भालशंकर सोनवणे चाचा अविनाश भडकुंबे अकील नाईकवाडी सैफन पटेल आदी पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त उपस्थित होते.

# महाराष्ट्रात प्रशासकीय पातळीवर मोठे फेरबदल तब्बल सात IAS अधिकाऱ्यांच्या बदल्या





**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यात आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. या निवडणुकांच्या पूर्वसंध्येला महाराष्ट्रात प्रशासकीय पातळीवर मोठे फेरबदल करण्यात येत आहेत. नव्या महायुती सरकारने याआधीदेखील प्रशासकीय पातळीवर फेरबदल केले होते. त्यानंतर आता पुन्हा नवे फेरबदल करण्यात आले आहेत. राज्यातील बड्या IAS स्तरावरच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये तीन जिल्हाधिकाऱ्यांच्या समावेश आहे. जळगाव, नाशिक, रत्नागिरीच्या जिल्हाधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे. तसेच 4 बड्या अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील प्रशासकीय पातळीवरचे हे महत्त्वाचे बदल आहेत. राज्य सरकारकडून याबाबत बदलीचा आदेश जारी करण्यात आला आहे. बदली करण्यात आलेले सर्व ज्येष्ठ अधिकारी हे ख्यातनामदेखील आहेत.

**7 बड्या अधिकाऱ्यांच्या बदल्या**

1) नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांची बदली करण्यात आली आहे. जलज शर्मा यांची नाशिक महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणच्या आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

2) जळगावचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांची नाशिक जिल्हाधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

3) ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांची देखील बदली करण्यात आली आहे. रोहन घुगे यांची जळगावच्या जिल्हाधिकारी पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

4) रत्नागिरीचे जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह यांची बदली करण्यात आली आहे. एम देवेंदर सिंह यांची मुंबईत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ बोर्डाच्या सदस्य सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

5) पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांची देखील बदली करण्यात आली आहे. शेखर सिंह हे आता नाशिकमध्ये कुंभमेळा आयुक्त म्हणून काम पाहणार आहेत. त्यांची कुंभमेळा प्राधिकरण आयुक्तपदी नियुक्ती झाली आहे.

6) मुंबईतील शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाचे व्यवस्थापकीय संचालक संजय कोलते यांची पुण्यातील रिक्त असलेल्या साखर आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

7) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक मनोज जिंदाल यांची रत्नागिरीचे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

निर्मल व्यसनमुक्ती केंद्र
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


# जिल्हयांतील दुसरे महायुध्द लाभार्थी हयातीचे दाखले जमा करणेबाबत

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हयातील दुसरे महायुध्द लाभार्थ्यानी शासनाच्या प्रचलीत नियमानुसार माहे नोव्हेंबर २०२५ अखेर पर्यंत आपले हयातीचे दाखले जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर येथे जमा करण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

जिल्हयांतील दुसरे महायुध्द लाभार्थ्यांनी आपला हयातीचा दाखला व त्यासोबत आधार कार्ड, पॅन कार्ड, ओळखपत्र व बँक पासबुक च्या पहिल्या पानाची छायांकीत प्रत या कार्यालयामध्ये प्रत्येक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दिनांक ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत जमा करावे. ज्या लाभार्थ्यांचे हयातीचे दाखले दिनांक ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर येथे प्राप्त होत नाहीत त्यांचे अनुदान माहे नोव्हेंबर २०२५ पासून बंद करण्यात येईल व हयातीचे दाखले प्राप्त झालेनंतर फरकासह अनुदान देण्यात येईल, असे पत्रकात नमूद आहे.

जिल्हयातील दुसरे महायुध्द लाभार्थ्यांनी लवकर आपले हयातीचे दाखले जमा करावे. तसेच ज्या लाभार्थ्यांचा मृत्यू झाला आहे अशा लाभार्थ्यांच्या मृत्यूचा दाखला अर्जासहीत त्यांच्या अवलंबितांनी लवकरात लवकर जमा करावा, असे अवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) ख्रिश्चन धर्मियांचा एक सण, ख्रिसमस २) डोके ३) गुणी, प्रामाणिक वृत्तीचा ४) दह्यात पाणी मिसळून हे तयार करतात ५) जेवणासाठी बसलेली रांग ६) हात ८) एक पक्षी ९) आश्चर्य १०) नगरचे माजी खासदार- *** विखे-पाटील ११) एक भारतीय गोलंदाज-यजुवेंद्र *** १२) शर्ट १३) इच्छा १४) दिलेले आश्वासन, वचन १५) लहान मूल १६) एक मराठी अभिनेत्री-*** प्रभुणे १७) वेडसर (हिंदीत) १८) शर्टची गळ्याभोवतीची पट्टी १९) धावपट्टू (इंग्रजीत) २१) पावसाची आतुरतेने वाट पाहणारा पक्षी २२) वस्तूंवर लावलेला टॅक्स, कर २३) कंबर (हिंदीत) २४) आत, आतील बाजूस (हिंदीत) २५) जवळ, समीप २६) खोलगट २७) काजूच्या जोडीचा एक पौष्टीक पदार्थ २८) दोन आणि अर्धा २९) शिवसेनेचे मुखपत्र ३०) पोट ३१) वायू, वारा ३२) कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेली शिक्षणसंस्था ३४) शपथ (हिंदीत) ३५) मनुष्य ३६) शंभर धावांचा टप्पा ३७) गाडीची गती ३८) गुलाम ३९) मनी नाही ** अन् देवा मला पाव

**आडवे शब्द :** १) उत्तर महाराष्ट्रातील एक जिल्हा ३) खा. उदयनराजे यांचा लोकसभा मतदारसंघ ५) बीडच्या एक नेत्या-*** मुंडे ७) वायर, धातूचा तंतू ८) लहान मुलाचा सांभाळ करणारे आई वडील, एक भाजी प्रकार ९) छोटे शहर ११) एक अंमली नशिला पदार्थ १२) पतीची दुसरी बायको १३) शर्टला बटण अडकविण्यासाठी केलेली खाच १४) स्तुती १५) ढग (हिंदीत) १६) वेळ (हिंदीत) १७) पैंजण (हिंदीत) १८) पूर्वीचा एक साथीचा रोग १९) एक अभिनेत्री-*** टंडन २०) हनुमानाच्या हातातील शस्त्र २१) वाहन चालविणारा २२) लालू प्रसाद यादव यांचा पक्ष-राष्ट्रीय *** दल २४) दोन्हीमधील तफावत २५) होकारच्या विरूध्दार्थी २६) विषमच्या विरूध्दार्थी २७) पाण्यावर तरंगणारा एक पक्षी २८) महाराष्ट्राचे एक नेते -*** पवार २९) शुगर, शर्करा ३०) मोठ्या मनाचा ३१) पडून राहिलेली जमीन ३२) वाळूवर रेषा काढून भविष्य जाणण्याची पध्दत ३३) धमकी देणे, संयम, धीर ३४) संरक्षक आवरण ३५) पत्राचा सुरूवातीचा मजकूर ३७) बैलाच्या नाकात घातलेली दोरी ३८) दान करण्याची वृत्ती ३९) शिजवलेला तांदूळ ४०) दोन नद्यांचा मिलाफ ४१) सशाची आणि याची शर्यतीची गोष्ट प्रसिध्द आहे ४२) जावकच्या विरूध्दार्थी शब्द

## सुडोकु - 76

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 5 | | 8 | 4 |
| | | 1 | 9 | | 6 | | | |
| | 4 | 9 | 7 | 2 | | 6 | | 3 |
| | | 5 | 2 | | 9 | | | |
| 9 | 2 | | 4 | 7 | | | | 1 |
| | 6 | 3 | 5 | | 1 | | 2 | |
| 1 | | | 6 | | | | | 2 |
| | 8 | 4 | | 5 | | | 9 | 6 |
| | 9 | 6 | | 1 | | 7 | | 5 |

# नातेपुते पोलीसांचा रोडरोमिओंना चोप, वाहनांवर कारवाई

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** शाळा, महाविद्यालयांसह बसस्टॉपवर तरुणींची छेड काढणाऱ्या, व ट्रिपल सीट फिरणाऱ्या रोडरोमिओंची नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे, पो.ह. देवीदास धोत्रे, पो.अमंलदार सारिका देशमुख, पो.कॉ. सोनवणे, पो.कॉ. गोधार, पो.कॉ. शेंडे या पोलिस कर्मचारी यांनी रोडरोमिओंना धरपकड करून चांगलाच चोप दिला. शुक्रवार दिनांक १० ऑक्टोबर रोजी शाळा भरतेवेळी व सुटण्याच्या वेळी दाते प्रशाला पुणे पंढरपूर रोड, श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील प्रशाला दहिगाव रोड, अक्षय शिक्षण संस्था फडतरी रोड, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय या ठिकाणी कॉलेजशी संबंधित नसलेल्या काही रोडरोमिओंना नातेपुते पोलिसांनी चोप देऊन समज दिली. अचानक झालेल्या या कारवाईमुळे इतर तरुणांनी धूम ठोकली. तसेच मेनपेट, अण्णाभाऊ साठे चौक, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक व गर्दीच्या ठिकाणी मोटर वाहनावर ट्रिपल सीट फिरणे, विना नंबर प्लेट व विना लायसन्स वाहन चालवणे या वेगवेगळ्या मोटर ॲक्ट नुसार वाहन विभागाचे वाहतुक पोलीस कर्मचारी रमेश बोराटे, नितिन पनासे यांच्याकडून वाहनांवर कारवाई करण्यात आली असून अल्पवयीन मुलांच्या वडिलांना नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे यांनी पोलीस ठाण्यामध्ये बोलवून समज दिली व यातील काहींवर प्रतिबंधात्मक कारवाई केली. दरम्यान, पोलिसांनी अशा प्रकारची मोहिम सातत्याने राबवावी अशी मागणी पालकांकडून करण्यात येत आहे. मोहीम अचानक आणि सातत्याने राबविली गेली तर रोडरोमिओंना चाप लावता येईल असे नागरिकांचे म्हणणे आहे.

शाळेशी संबंध नसलेले तरुण शाळेच्या आवारात आढळल्यास त्यांची गय केली जाणार नाही. तसेच बस स्थानकात व इतर ठिकाणी मोटर सायकल घेऊन फिरणे, हॉर्न वाजवणे असे प्रकार निदर्शनास आल्यास त्या तरुणावर कठोर कारवाई केली जाणार असून त्यांचे वाहन जप्त करण्यात येईल. तसेच पालकांनी आपल्या अल्पवयीन मुलांच्या हातात वाहन देऊ नये तसे निदर्शनास आल्यास अल्पवयीन मुलाच्या पालकांवर गुन्हा दाखल करण्यात येईल. नातेपुते व परिसरातील नागरिकांनी वाहन नियमाचे पालन करून पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे.
**- महारुद्र परजणे,** (सपोनी नातेपुते पोलीस ठाणे)



# महाराष्ट्रात प्रशासकीय पातळीवर मोठे फेरबदल, तब्बल सात IAS अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यात आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांच्या पूर्वसंध्येला महाराष्ट्रात प्रशासकीय पातळीवर मोठे फेरबदल करण्यात येत आहेत. नव्या महायुती सरकारने याआधीदेखील प्रशासकीय पातळीवर फेरबदल केले होते. त्यानंतर आता पुन्हा नवे फेरबदल करण्यात आले आहेत. राज्यातील बड्या कक्षर स्तरावरच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये तीन जिल्हाधिकाऱ्यांच्या समावेश आहे. जळगाव, नाशिक, रत्नागिरीच्या जिल्हाधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे. तसेच



4 बड्या अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील प्रशासकीय पातळीवरचे हे महत्त्वाचे बदल आहेत. राज्य सरकारकडून याबाबत बदलीचा आदेश जारी करण्यात आला आहे. बदली करण्यात आलेले सर्व ज्येष्ठ अधिकारी हे ख्यातनामदेखील आहेत.

**7 बड्या अधिकाऱ्यांच्या बदल्या**

1) नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांची बदली करण्यात आली आहे. जलज शर्मा यांची नाशिक महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणच्या आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

2) जळगावचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांची नाशिक जिल्हाधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

3) ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांची देखील बदली करण्यात आली आहे. रोहन घुगे यांची जळगावच्या जिल्हाधिकारी पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

4) रत्नागिरीचे जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह यांची बदली करण्यात आली आहे. एम देवेंदर सिंह यांची मुंबईत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ बोर्डाच्या सदस्य सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

5) पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांची देखील बदली करण्यात आली आहे. शेखर सिंह हे आता नाशिकमध्ये कुंभमेळा आयुक्त म्हणून काम पाहणार आहेत. त्यांची कुंभमेळा प्राधिकरण आयुक्तपदी नियुक्ती झाली आहे.

6) मुंबईतील शिवाजी पुनर्वसन प्रकल्पाचे व्यवस्थापकीय संचालक संजय कोलते यांची पुण्यातील रिक्त असलेल्या साखर आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

7) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक मनोज जिंदाल यांची रत्नागिरीचे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# पंचायत समिती सभापतिपद आरक्षण जाहीर

## माढा, माळशिरस, दक्षिण सोलापूरचे सभापतिपद खुले; महिलांना सहा ठिकाणी संधी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील अकरा पंचायत समित्यांच्या सभापतीचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. यामध्ये महिलांसाठी पन्नास टक्के म्हणजेच सहा पंचायत समित्यांचे सभापतिपद आरक्षित झाले आहे. जिल्ह्यातील केवळ माढा, माळशिरस आणि दक्षिण सोलापूर पंचायत समित्यांचे सभापतीपद खुले असणार आहे. त्यामुळे या ठिकाणी सर्वाधिक चुरस असणार आहे. याशिवाय कुणबी मराठा प्रमाणपत्रामुळे ओबीसींच्या जागेवर स्पर्धा दिसणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जानेवारी २०२६ पर्यंत घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यानुसार निवडणूक आयोगाने कामाला सुरुवात केली आहे. राज्यातील जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाचे आरक्षण यापूर्वी जाहीर झाले आहे. त्या ठिकाणी निराशा झालेल्या इच्छुकांचे लक्ष



पंचायत समितीच्या सभापतीपदाच्या आरक्षणाकडे लागले होते.

सोलापूरच्या नियोजन भवनात जिल्ह्यातील अकरा पंचायत समित्यांच्या सभापतीपदाचे आरक्षण काढण्यात आले, त्यानुसार जिल्ह्यातील तीन पंचायत समित्यांचे सभापतिपद हे खुले (सर्वसाधारण प्रवर्ग) असणार आहे. खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी तीन पंचायत समित्यांचे सभातिपद आरक्षित असणार आहे. तीन पंचायत समित्यांवर ओबीसींना, तर दोन ठिकाण अनुसूचित जाती प्रवगार्ला संधी मिळणार आहे.

सभापतिपदाचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर आता जिल्हा परिषदेचे गट आणि पंचायत समित्यांचे गणाच्या आरक्षणाचे सर्वांचे लक्ष असणार आहे. जिल्हा परिषद अध्यक्षांपाठोपाठ आता पंचायत समित्यांच्या सभापतिपदाचे आरक्षण जाहीर झाल्याने इच्छुकांच्या मोर्चेबांधणीला वेग येणार आहे. तसेच, राजकीय पक्षांकडूनही तयारीला सुरूवात होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# संकटकाळी माणुसकी जिवंत ठेवण्याचे काम इंडियन रेड क्रॉस सोसायटीने केले - पालकमंत्री गोरे

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** इंडियन रेड क्रॉस सोसायटी बार्शीच्या वतीने बार्शी तालुक्यातील अतिवृष्टी व पूरग्रस्त बाधित 1200 लाभार्थ्यांना संसार उपयोगी साहित्याचे वाटप पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी आमदार राजेंद्र राऊत, इंडियन रेड क्रॉसचे सचिव अजित कुंकूलोळ, प्रांताधिकारी सदाशिव पडदुने, तहसीलदार एफ.आर.शेख, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे,शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी वाय यादव, माजी नगराध्यक्ष असिफभाई तांबोळी, माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, इंडियन रेड क्रॉसचे उपाध्यक्ष डॉ. विक्रम निमकर संतोष सूर्यवंशी, अशोक डहाळे, डॉ. दिलीप कराड, अतुल सोनिग्रा, प्रतापराव जगदाळे, प्रशांत बुडून उपस्थित होते.



कार्यक्रमाचे प्रस्ताविकात बोलताना अजित कुंकूलोळ यांनी इंडियन रेड क्रॉस शाखा बार्शीच्या कायार्ची माहिती मान्यवरांना दिली. 1974 साली स्थापन झालेल्या बार्शी शाखेच्या मार्फत सर्वप्रथम ब्लड बँक व मूकबधिर विद्यार्थ्यासाठी शाळेची स्थापना झाली. ब्लड बँकेच्या माध्यमातून गरजू रुग्णांना रक्त उपलब्ध करून देण्याचे काम केलेआहे. ज्या ज्या वेळी महाराष्ट्रात आपत्कालीन परिस्थिती, दुष्काळ परिस्थिती, पूर पूरपरिस्थिती, आग लागणे, 1993 चा किल्लारीचा भूकंप, अशा संकटकाळी परिस्थितीत इंडियन रेडक्रॉसने मदत केलेली आहे. 2006-07 साली सोलापूर जिल्ह्यात उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, पंढरपूर व अक्कलकोट येथे निर्माण झालेल्या पूर परिस्थितीत दोन ते तीन हजार कुटुंबाला संस्थेच्या स्वयंसेवकांनी मुक्काम मुक्कामी राहून मदत केलेली त्यांनी सांगितले. जागतिक स्तरावर आमच्या शाखेच्या कायार्ची दखल घेत हाँगकाँग कडून संपूर्ण देशातून बार्शी शाखेची निवड होऊन 50 लाख रुपयांची मदत हॉंगकॉंग कडून मिळालेली आहे. यातून कांदलगाव व कासरवाडी येथे महिलांचे बचत गट स्थापन करून त्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून दिला. बार्शी शहरात 2007 साली तळ्याच्या सांडवा फुटून बार्शी शहरात पाणी शिरले होते, त्यावेळी सुद्धा इंडियन रेड क्रॉसने मदत केली. त्याचबरोबर 14 वर्षे सातत्याने पंढरपूर वारीमध्ये वारकऱ्यांसाठी वैद्यकीय सेवा देण्याचे काम इंडियन रेड क्रॉसच्या वतीने करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना पालकमंत्री म्हणाले की, सामाजिक जाणीव व भान असणारी इंडियन रेड क्रॉस सोसायटी ही आपत्तीच्या काळात लोकांच्या मदतीला येते हे कौतुकास्पद आहे. संकटकाळी लोकांच्या पाठीशी उभे, राहून, संकटकाळी माणुसकी जिवंत ठेवण्याचे काम इंडियन रेड क्रॉसने केले आहे. अतिवृष्टी व पूर परिस्थितीत महाराष्ट्रात आत्तापर्यंतची सर्वात मोठी मदत या संस्थेकडून झालेली पहावयास मिळते. संकट समयी आधार देण्याच्या इंडियन रेडक्रॉस संस्थेच्या भूमिकेचे त्यांनी स्वागत व कौतुक केले.

महाराष्ट्र शासनाच्या वतीनेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या हितासाठी 31 हजार 500 कोटींची भरीव मदत शेतकऱ्यांना केलेली आहे. महाराष्ट्रातील शेतकरी व जनतेच्या पाठीशी उभे राहून व एनडीआरएफ च्या निकषाच्या पुढे जाऊन महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्रातील जनतेला मदत केली आहे.

**पालकमंत्र्यांची घोषणा**

सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टी व पूर परिस्थितीने बाधित झालेल्या 30 हजार कुटुंबाला दिवाळीत मदत करण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतल्याचे त्यांनी जाहीर केले. या 30000 कुटुंबाची दिवाळी गोड होण्यासाठी मेणबत्ती, पणती पासून ते लागणा-या डाळी, किराणा व इतर साहित्य बाधित कुटुंबांना पोहोचविले जाईल अशी घोषणा त्यांनी केली.

अतिवृष्टी व पूर परिस्थितीच्या काळात माजी आमदार राजेंद्र राऊत हे माज्या दररोज संपर्कात होते, दिवसातून दोन ते तीन फोन करून तालुक्यातील संपूर्ण माहिती मला देत होते व मदतीसाठी काय करता येईल याबाबत चर्चा करत होते. बाशीर्तील प्रश्नांसाठी सतत हजर राहण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी आवर्जून सांगितलेले आहे. त्या ठिकाणी आपले आमदार हे राजेंद्र राऊत आहेत हे समजूनच तालुक्यातील जनतेला प्रत्येक वेळी मदत केली जाईल असेही मुख्यमंत्र्यांनी आवर्जून सांगितल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना माजी आमदार राजेंद्र राऊत म्हणाले की, मानवता धर्म मानून इंडियन रेड क्रॉस सोसायटीने शेतकरी बांधवांना मदत केलेली आहे. संकटात व आपत्तीच्या घटनेत नेहमी इंडियन रेड क्रॉस व त्यांचे सहकारी धावून जातात. शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होण्यासाठी व मदतीचा हात देण्यासाठी पालकमंत्री आवर्जून या कार्यक्रमासाठी आले आहेत. संकटात व दुःखात असलेल्या बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी पालकमंत्री या ठिकाणी आल्याबद्दल त्यांचे त्यांनी आभार व्यक्त केले. त्याचप्रमाणे बाशीर्तील अनेक स्वयंसेवी संस्था, संघटना रोख रक्कम व धनादेशच्या स्वरूपात मुख्यमंत्री सहाय्यता निधीस मदत देत आहेत त्याबद्दलही त्यांचे आभार व्यक्त केले. त्याचप्रमाणे कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शीच्या वतीने 1 कोटी 51 लाख रुपयांची मदत मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देणार असल्याचे राऊत म्हणाले.

# पशुसंवर्धन विभागाच्यावतीने जागतिक अंडी दिन साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात १० ऑक्टोंबर हा दिवस पशुसंवर्धन विभागाच्या सघन कुक्कुट विकास गट, नेहरू नगर, सोलापूर च्यावतीने ह्लजागतिक अंडी दिन" म्हणून अंगणवाडी व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नेहरू नगर, सोलापूर तसेच बापुजी प्राथमिक शाळा, लष्कर व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, राज्य राखीव पोलीस दल, गट क्र. १० आणि सघन कुक्कुट विकास गट, नेहरू नगर येथील प्रशिक्षणार्थ्यानां उकडलेली अंडी वाटप करून साजरा करण्यात आला.




त्याचप्रमाणे संपूर्ण जिल्ह्यामध्ये मानवी आहारात अंड्याचे पोषणमूल्य व त्याचे महत्व विषद करून जिल्हा परिषद शाळा/अंगणवाडी/ राज्य राखीव पोलीस दल शाळा येथील विद्यार्थ्यांना व या संस्थेच्या कुक्कुटपालन व्यवसाय प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यानां साधारणपणे १००० उकडलेली अंडी वाटप करून जागतिक अंडी दिन साजरा करण्यात आला. जागतिक अंडी दिनाच्या कार्यक्रमासाठी सघन कुक्कुट विकास गट, नेहरू नगर, सोलापूर या संस्थेचे प्रमुख डॉ. स्नेहंका बोधनकर, पशुधन विकास अधिकारी गट- अ यांनी दैनंदिन आहारामध्ये अंड्याच्या पोषणतत्वांची माहिती विस्तृतपणे माहिती दिली. तसेच दैनंदिन जीवनातील आहारामध्ये अंड्याचा वापर जास्तीत जास्त प्रमाणात उपयोग करून शालेय विद्यार्थ्यांनी व नागरीकांनी आपले आरोग्यरक्षण करणे आवश्यक आहे असे विषद केले. तसेच डॉ. भोसले शिवाजी, खाजगी पोल्ट्री सल्लागार, सोलापूर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी जागतिक अंडी दिनानिमित्त दैनंदिन अंडी खाण्यात आल्याने कर्करोगासारख्या दुर्धर आजारावर मात करता येते. तसेच अंडी हे भेसळमुक्त असून शाकाहारी असल्याचे सांगितले.

जागतिक अंडी दिनाच्या निमित्ताने प्रसाद कृष्णाजी भगत, भैरवनाथ हायटेक अग्रो प्रा. लि. मुस्ती (पिंजारवाडी) ता. द. सोलापूर आणि वेकंटराव, बालाजी पोल्ट्री फार्म, बाणेगाव ता. उ. सोलापूर जि. सोलापूर यांनी पशुसंवर्धन विभागास अंडीचे प्रयोजन/उपलब्धी करून दिली.

यावेळी डॉ. स्नेहंका बोधनकर व डॉ. भोसले शिवाजी, बालाजी फार्म्स सोलापूर यांनी अंडीचे महत्व विषद करून मानवी आहारात अंडी खाण्याचे जनतेस आवाहन केले. तसेच सदर कार्यक्रमासाठी थोरबोले, मुख्याध्यापक, जि.प. प्रा. शाळा, नेहरू नगर, सो. श्रीमती ज्ञानेश्वरी संगीतकर, मुख्याध्यापक, बापुजी प्राथमिक शाळा, लष्कर, सो. तसेच पुंडलिक कलखांबकर, मुख्याध्यापक, जि.प.प्रा. शाळा,राज्य राखीव पोलीस दल, गट क्र. १० सोरेगाव व सर्व त्यांचे शिक्षकवृंद्ध व अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी सहकार्य केलेले आहे.

कार्यक्रमाचे आयोजन सघन कुक्कुट विकास गट, सोलापूर येथील डॉ. स्नेहंका बोधनकर, पशुधन विकास अधिकारी गट- अ, एस. पी. माने, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी तसेच परिचर दिनानाथ जमादार, संताजी देशमुख व प्रशांत निकंबे यांनी परिश्रम घेतले.

# नेताजी प्रशालेत आकाशकंदील, पणती व ग्रीटिंग कार्ड कार्यशाळा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेत दिवाळी निमित्त आकाशकंदील, पणती आणि ग्रीटिंग कार्ड तयार करण्याचे कार्यशाळा घेण्यात आले. या कार्यशाळेला १५४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आपल्या कल्पनाशक्तीला व सृजनशीलतेला मूर्त रूप दिले.

विद्यार्थ्यांनी रंगीबेरंगी कागद, ट्रान्स्परंट पेपर, चमकदार साहित्य, कागदी फुले, क्राफ्ट पेपर, रंग, कात्री, गोंद आदी साहित्यांचा वापर करून आकर्षक आकाशकंदील, देखण्या पणत्या आणि सुंदर शुभेच्छापत्रे तयार केली.

प्रथम ४७८ इंच आकाराचा रंगीत कागद निवडून कात्रीने काटेकोरपणे कापण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.त्यावर सजावटीसाठी कागदी फुले, चमक, डिझाईन बनविण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. आकाश कंदीलला सिलेंडरचा आकार देऊन खाली पट्टया



लावण्यात आल्या.पणत्यांना रंगवून त्यावर कलात्मक रेखाटन करण्यात आले.ग्रीटिंग कार्डसाठी शुभेच्छा संदेश, चित्रकला आणि सजावट यांचा मिलाफ करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, कलागुणांचा विकास घडविणे तसेच पर्यावरणपूरक सण साजरा करण्याची प्रेरणा देणे या हेतूने कार्यशाळा घेण्यात आली.

या विद्यार्थ्यांना कलाशिक्षक शैलेश स्वामी यांचे मार्गदर्शन लाभले. मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, गणपती पाटील व शिक्षक वृंदानी या कार्यशाळेत भेट देऊन विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे मनापासून कौतुक केले.

# ओला-उबर, रॅपिडोसह सर्व ॲप आधारित सेवांसाठी नवे मानक ठरवले जाणार - मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील ॲप-आधारित प्रवासी वाहतूक सेवांमध्ये (उदा. ओला, उबर, रॅपिडो) अधिक शिस्तबद्धता, पारदर्शकता आणि प्रवासी सुरक्षेसाठी महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र मोटर वाहन ॲग्रीगेटर नियम, २०२५' या मसुदा नियमांची घोषणा केली. हे नियम मोटर वाहन कायदा, १९८८ च्या कलम ७३, ७४ आणि ९३ अंतर्गत प्रस्तावित असून, १७ ऑक्टोबर २०२५ पर्यत या हरकती व सूचना मागविण्या आल्या असून त्यानंतर लागू होईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

या नव्या नियमांमुळे ॲग्रीगेटर कंपन्या, चालक आणि प्रवासी यांच्यातील संबंध अधिक पारदर्शक होतील तसेच भाडे, सेवा गुणवत्ता, चालकांचे हक्क आणि प्रवासी सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण बदल होणार आहेत.

**नियम यांना लागू होणार**

हे नियम ई-रिक्षासह सर्व प्रवासी मोटार वाहनांच्या ॲग्रीगेटरना लागू होतील. म्हणजेच, ओला-उबरसारख्या कॅब सेवांसोबत ई-रिक्षा सेवा देखील या चौकटीत येतील.

तसेच, बाईक-टॅक्सी सेवांसाठी स्वतंत्र 'महाराष्ट्र बाईक-टॅक्सी नियम, २०२५' लागू राहतील आणि त्यासाठी वेगळा परवाना घ्यावा लागेल.

**परवाना शुल्क आणि सुरक्षा ठेव**

राज्य परिवहन प्राधिकरण (प्रति जिल्हा)

परवाना देणे ₹१०,००,०००, परवाना नूतनीकरण ₹२५,०००

प्रादेशिक परिवहन प्राधिकरण (प्रति जिल्हा)

परवाना देणे ₹२,००,०००, परवाना नूतनीकरण ₹५,०००

याशिवाय ॲग्रीगेटरला वाहनसंख्येप्रमाणे सुरक्षा ठेव द्यावी लागेल.

वाहनांची संख्या १०० बस किंवा १००० वाहनांपर्यंत- सुरक्षा ठेव - १० लाख

वाहनांची संख्या १००० बस किंवा १०,००० वाहनांपर्यंत - सुरक्षा ठेव - २५ लाख

# बार्शी एम आर संघटनेकडून कडून पूरग्रस्तांना आर्थिक मदत



**बार्शी, (कटूसत्य वृत्त):-** बार्शी वैद्यकीय प्रतिनिधी (एम. आर.) संघटने च्या सदस्यांनी सामाजिक बांधिलकी चे भान ठेवत आपला एक दिवसाचा पगार देवून ग्रामीण भागातील पूरग्रस्ताना मदत केली. आर्थिक मदतीचा हात दिला.ग्रामीण भागातील लोकांचे मागच्या पंधरा दिवसात झालेल्या पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. अनेकांची शेती घरे पुरामुळे उध्वस्त झाली आहेत. या गोष्टी चा विचार करून बाशीर्तील एम आर संघटनेने त्या गरजूंना मदतीचा हात देवून. समाजापुढे एक आदर्श ठेवला आहे.

जमा झालेली रक्कम ही सिरसाव, देवगाव, जवळा आणि लहू या गावातील प्रतिनिधी पांडुरंग देवराम, दिग्विजय मांजरे, बालाजी घाडगे आणि रविराज चव्हाण यांच्याकडे सुपूर्त करण्यात आली. त्यांनी या पैशातून गावातील गरजूंना शालेयसाहित्य, धान्य, कपडे आणि औषध या स्वरूपात मदत पोहच केली.

यावेळी बोलताना संघटनेचे युनिट सेक्रेटरी मनोज कुलकर्णी यांनी सांगितले की या अगोदर देखील एमआर संघटनेने अनेक समाज उपयोगी उपक्रम बार्शी शहरांमध्ये घेतले आहेत. यावेळी संघटनेचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहीर प्रसिध्दीकरण क्र.अभि/कावि नं. ३२८/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार सो, यांचे समोर**

संदिप नामदेव खताळ
वय-३० वर्षे,धंदा-खाजगी नोकरी,
रा.चिंचोलीकाटी, ता.मोहोळ, जि. सोलापूर. } **अर्जदार**

**विरुध्द**

ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत चिंचोलीकाटी, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांचे वडील नामदेव चांगदेव खताळ हे मौजे चिंचोलीकाटी, ता. मोहोळ येथे राहते घरी दि.०१/०६/१९६७ रोजी जन्मलेले आहेत. त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत चिंचोलीकाटी, ता. मोहोळ, जि. सोलापूर यांचे जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. अर्जदाराच्या वडीलांची जन्माची नोंद ग्रामपंचायत चिंचोलीकाटी चे जन्माचे रजिस्टरला व्हावे याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार याचे वडील नामदेव चांगदेव खताळ यांची जन्माची नोंद ग्रामपंचायत चिंचोलीकाटी यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन१५ दिवसाच्या आत अथवा दि.१०/११/२०२५ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत म्हणणे न आल्यास अर्जदारास त्यांचे अर्जातील मागणी प्रमाणे पुढील जरुर ते आदेश होतील याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे. ता. ११/१०/२०२५

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन तहसीलदार मोहोळ सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण क्र.अभि/कावि नं. ७७/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार सो, यांचे समोर**

श्रीकांत कुंडलिक शिंदे,
वय - २० वर्षे, धंदा- शिक्षण,
रा. कोळेगांव, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } **अर्जदार**

**विरुध्द**

ग्रामपंचायत कोळेगांव,
ता. मोहोळ, जि. सोलापूर. } **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांनी त्यांचा भाऊ सुर्यकांत कुंडलिक शिंदे याचा जन्म दि. २४/०९/२००८ रोजी मौजे कोळेगांव, ता. मोहोळ येथे अर्जदाराच्या राहत्या घरी झाला आहे. परंतु त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कोळेगांव, ता. मोहोळ, जि. सोलापूर ग्रामपंचायत जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी वर नमुद अर्जदाराचा भाऊ सुर्यकांत कुंडलिक शिंदे यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कोळेगांव यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याच्या आत अथवा दि. १०/११ / २०२५ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारांना त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे अर्ज मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे ता. ११/१०/२०२५

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन तहसीलदार मोहोळ सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण क्र.अभि/कावि नं. ३१५/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार सो, यांचे समोर**

रामा ऊर्फ रामचंद्र पंडा शेणमारे,
वय - ७८ वर्षे, धंदा - शेती,
रा. नरखेड, ता. मोहोळ,
जि. सोलापूर. } **अर्जदार**

**विरुध्द**

ग्रामपंचायत नरखेड
ता. मोहोळ, जि.सोलापूर (अर्जाची नोटीस ग्रामसेवक नरखेड, ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी ). } **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांची आई गोजरबाई पंडा शेणमारे हिचा मृत्यू दि.१५/०६/२००६ रोजी मौजे नरखेड, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे मयत झालेले आहेत. तरी, त्यांच्या मृत्यूची नोंद सामनेवाला यांचेकडे होऊन, तसा मृत्यू दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी या मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचे मागणीप्रमाणे अर्जदार यांची मयत आई गोजरबाई पंडा शेणमारे हिचा मृत्यू दाखला देण्यास कोणाचीही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी हे जाहिर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत सदर प्रकरणाचे कामी पुढील नेमलेली ता. १०/११ / २०२५ रोजी अथवा त्यापुर्वी स्वतः अगर वकीला मार्फत लेखी म्हणणे दाखल करावे. सदर मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास अर्जदाराच्या अर्जावर पुढील योग्य ते हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.जाहिर प्रसिध्दीकरण दिले असे. ता. ११/१०/२०२५

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन तहसीलदार मोहोळ सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण क्र.अभि/कावि नं. ३७३/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार सो, यांचे समोर**

बिराप्पा सिद्धाप्पा माने
वय: २२ वर्षे धंदा: शेती
रा. कागस्ट तालुका मंगळवेढा,जिल्हा सोलापूर } **अर्जदार**

**विरुद्ध**

ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत घोडेश्वर ता. मोहोळ जिल्हा सोलापूर } **सामनेवाला**

ज्या अर्थी वर नमूद अर्जदार यांचे वडील सिद्धाप्पा तुकाराम यांचा मृत्यू तारीख:०९/०६/२०१७ रोजी मौजे घोडेश्वर तालुका मोहोळ जिल्हा सोलापूर येथे झाला आहे.अर्जदार यांनी सामनेवाला यांचे कडे त्यांचे वडील यांच्या मृत्यू दाखल्याची मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील २०१७चे अभिलेखात मयत सिद्धाप्पा तुकाराम माने यांची मृत्यूची नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्या बद्दल अर्जदाराने या मे कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात मृत्यूची नोंद घेणेबाबत आदेश होण्यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.या बाबत कोणाचा आक्षेप हरकत असल्यास ता.०७ / ११ /२०२५ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे.कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देनेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धीकरण आमचे सही व शिक्क्यानिशी दिले असेतारीख:११/१०/२०२५

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन तहसीलदार मोहोळ सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण क्र.अभि/कावि नं. ३२१/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार सो, यांचे समोर**

श्री. नवनाथ भिमराव काळे,
वय - ३७ वर्षे, धंदा- मजुरी,
रा. नजिक पिंपरी, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } **अर्जदार**

**विरुध्द**

ग्रामपंचायत नजिक पिंपरी,
ता. मोहोळ, जि. सोलापूर. } **सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदाराची मुलगी अमृता नवनाथ काळे हिचा जन्म दि.६/१२/२०२० रोजीमौजे नजिक पिंपरी,ता.मोहोळ येथे अर्जदाराच्या राहत्या घरी झाला आहे. परंतु मुलीच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत नजिक पिंपरी, ता. मोहोळ, जि. सोलापूर ग्रामपंचायत जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी वर नमुद अर्जदाराची मुलगी अमृता नवनाथ काळे हिच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कोळेगांव यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत अथवा दि.२१ /११ /२०२५ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारांना त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे अर्ज मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे ता. ११/ ११/२०२५

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन तहसीलदार मोहोळ सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण क्र.अभि/कावि नं. /२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार सो, यांचे समोर**

अजित कृष्णदेव वळकुंडे
रा. शिरापूर सो ता. मोहोळ जि.सोलापूर } **अर्जदार**

**विरुद्ध**

ग्रापंचायत गोटेवाडी ता. मोहोळ } **सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार अजित कृष्णदेव वळकुंडे जन्म दि.१/१/२००६ रोजी गोटेवाडी ता. मोहोळ. जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला अजित कृष्णदेव वळकुंडे यांच्या जन्मा बाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जानेवारी २००६ चे आभिलेखात अर्जदार यांच्या जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२५/१०/२०२५ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वतअथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता. ११/१०/२०२५

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन तहसीलदार मोहोळ सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण दि.कि.अर्ज क्र: ५८/२०२५ नि.६

**माढा 'येथील मे. सिव्हील जज्ञ ज्युनिअर डिव्हीजन श्री पी. जी. लंबे सो. यांचे कोर्टात**

१) दशरथ गेना चव्हाण
२) कांताबाई ज्ञानदेव जाधव
दोघे रा. परिते ता.माढा, जि. सोलापूर } **अर्जदार**

**// विरुध्द //**

कोणी नाही } **सामनेवाला**

ज्या अर्थी अर्जदार यांचे वडील गेना यांचे चुलते संभु पर्वता चव्हाण हे सन १९५३ साली मयत झाले असुन त्यांचे पश्चात अर्जदार यांचे वडील गेना हे वारस असुन मयत गेना यांचे पश्चात अर्जदार हे कायदेशीर वारस असल्याने मयत संभु यांचे नावे असलेल्या मिळकतीस परितेवाडी येथील जमीन गट नंबर १९२/३ ते १९२/७ तसेच मौजे माळेगांव ता. माढा येथील जमीन गट नंबर ८ / १ या मिळकतीवर अर्जदार यांचे नावाची नोंद होवुन मिळणेसाठी महसुल कार्यालयाकडे वेळोवेळी तोंडी व लेखी स्वरुपात पाठपुरावा केला असता महसुल अधिकाऱ्यांनी यातील अर्जदार यांना वारसप्रमाणपत्राची मागणी केली. त्यानुसार अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी याव्दारा सुचित करण्यात येते की, सदर अर्जाचे कामी कोणाची हरकत असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत समक्ष अथवा आपले वकीलामार्फत हरकत नोंदवावी. अन्यथा कोणाची हरकत नाही असे समजुन सदर कामी पुढील चौकशी केली जाईल व जरुर तर वारस दाखला प्रदान केला जाईल याची नोंद घ्यावी. प्रस्तुची जाहीर प्रसिध्दीकरण ही मे कोर्टाचे हुकूमानुसार मे. कोर्टाचे शिक्यानिशी व आमचे सहीने दिली ता.११/१०/२०२५

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन सहा अधिक्षक दि.न्यायालय क..स्तर,माढा**